# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२० / फाल्गुन १६, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(४) ग्रामविकास मंत्री**<br>**(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री**<br>**(६) महिला व बालविकास मंत्री**<br>**(७) मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### आतोणे (ता.रोहा, जि.रायगड) गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरुस्ती करण्याबाबत

**(१) * ३६६३ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आतोणे (ता.रोहा, जि.रायगड) गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेची देखभाल व दुरुस्तीअभावी दुरवस्था झालेली असून गेल्या तीन ते चार वर्षापासून इमारतीची पूर्णपणे जीर्णवस्था झाल्याने येथील आदिवासी वाडीतील समाजमंदिरात शाळा भरविली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समाजमंदिराला गळके पत्रे व खिडक्यांना दारे नसुन स्वच्छतागृहाअभावी विद्यार्थीनींची अत्यंत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळेसंदर्भात ग्रामपंचयतीने अनेकदा प्रस्ताव देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या शाळेच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शाळाचे वर्ग भरविण्यात येत असलेल्या समाजमंदिराची दुरुस्ती लोकसहभागातून करण्यात आली आहे. तसेच, जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध निधितून स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील क-हा नदीवरील बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) * ५६०३ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील क-हा नदीवर असलेले बंधारे माहे ऑक्टोबर, २०१९ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधाऱ्यात पाणी साठत नसल्याने स्थानिक नागरिकांना आगामी दोन महिन्यानंतर पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने पाहणी करुन येथील वाहून गेलेले बंधारे तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

पुरंदर तालुक्यातील क-हा नदीवर असलेले बंधारे माहे ऑक्टोबर, २०१९ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेलेले नाहीत. त्यांच्या बाजुला असलेला माती भराव वाहून गेलेला आहे.
(२) व (३) सदर बंधाऱ्यात पाणीसाठा करणेसाठी १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या बंधारे दुरुस्ती कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या बंधा-यांच्या दुरुस्ती कामांसाठी क्षेत्रीय यंत्रणांकडून जिल्हा परिषद, पुणे व जिल्हा नियोजन समिती यांचेकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

याशिवाय क-हा नदी व तिच्या उपनदीवरील दुरुस्तीस पात्र अशा बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे जलसंधारण कामांचा दुरुस्ती कार्यक्रम सन २०२०-२१ अंतर्गत आराखड्यात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वेनवडी उपसा जलसिंचन योजनेबाबत

**(३) * ५९९१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वेनवडी उपसा जलसिंचन योजनेच्या मंजूर झालेल्या कामांना रुपये १८ कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने वेनवडी उपसा जलसिंचन योजनेच्या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) व (२) भोर (जिल्हा पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वेनवडी उपसा जलसिंचन योजनेस निधी मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींकडून मा.जलसंपदा मंत्री यांना दि.२०.१.२०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रान्वये मागणी केली असल्याचे अद्यापपर्यंत आढळून आलेले नाही. तथापि, मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली निरा-देवधर प्रकल्पाबाबत दि.२८.१.२०२० रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत “निरा-देवधर प्रकल्पातील वेनवडी उपसा सिंचन योजनेसाठी अतिरिक्त रु.२० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.श्री.संग्राम थोपटे, विधानसभा सदस्य यांनी केली. ही मागणी शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इमारती व वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * ४०२३ श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात असलेल्या जिल्हा परिषद शाळांच्या सुमारे ५२८ वर्ग खोल्या धोकादायक असून त्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या १७४ पैकी १४२ वर्ग खोल्या, पंढरपूर तालुक्यातील २२ शाळा व ७१ इमारती तसेच मंगळवेढा तालुक्यातील १७ शाळा व ४८ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यास जिल्हा परिषदने मंजूरी दिलेली असतानाही संबंधित तालुकास्तरावरून याबाबत विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शाळा, इमारती व वर्ग खोल्यांची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

निर्लेखित केलेल्या धोकादायक वर्ग खोल्या पाडण्याबाबत ग्राम पंचायती पातळीवर प्रलंबित आहे.

(४) होय.

आज अखेर तिन्ही तालुक्यातील एकूण ७०१ खोल्यांचे पाडकाम पूर्ण झालेले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## उंबरगव्हाण (ता.कळवण, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याबाबत

**(५) * ५८९७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरगव्हाण (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आदिवासी बांधवांकरिता शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन प्राथमिक आरोग्य केंद्राची दोन वर्षापूर्वी इमारत बांधून या प्राथमिक आरोग्य केंद्रात आकृतीबंधानुसार वैद्यकिय अधिकाऱ्यांसह आवश्यक पदे मंजूर करुनही अदयापही सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बंद अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रास आवश्यक पदे मंजूर करुनही इमारत अद्याप विनावापर पडून असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२), (३) हे खरे नाही.
उंबरगव्हाण (ता.कळवण, जि.नाशिक) हे नवनिर्मित प्राथमिक आरोग्य केंद्र दि.२७ जुलै, २०१९ रोजी कार्यन्वित करण्यात आले आहे व त्यात २ वैद्यकिय अधिकाऱ्यांसह इतर कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत व बाहयरुग्ण विभाग नियमित स्वरुपात चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोधैर्य योजने पासून पिडीत महिला व बालके वंचित असल्याबाबत

**(६) * २५१९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत पिडीत महिला व बालके यापैकी जवळपास ४०० महिला व ६२५ बालके त्यांच्या पत्यावर राहत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लैंगिक अत्याचारला बळी पडलेल्या महिला आणि बालकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने मनोधैर्य योजनेअंतर्गत प्रत्येकी १० लाख मंजूर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील पीडित महिला व बालके यांचे सध्याचे राहण्याचे ठिकाण शोधून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) होय.

(२) होय.

मनोधैर्य योजनेच्या सुधारीत शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि.३०.१२.२०१७ नुसार लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिला व बालकांना प्रकरणनिहाय रुपये ३ ते १० लाखापर्यंत अर्थसहाय्य अदा करण्याची तरतूद आहे. यानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे मार्फत प्रकरण निहाय अर्थ सहाय्याची रक्कम निश्चित करण्यात येते.

(३) पिडीत महिला व बालके यांचे सध्याचे रहावयाचे ठिकाण शोधुन काढण्यासाठी पोलीस विभागास अवगत करण्यात आले असून अशा पिडीतांचे राहण्याचे ठिकाण शोधण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात डेंग्यूची लागण होऊन रुग्णांचे होत असलेले मृत्यू

**(७) * १८६८ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राम सातपुते**

**(माळशिरस), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढते शहरीकरण, अनियमित पाऊस आणि सततच्या बदलत्या वातावरणामुळे सन २०१४-२०१८ या पाच वर्षात ३९१४१ रुग्णांना डेंग्यूची लागण होऊन त्यामध्ये २३० नागरीकांचा मृत्यू झाल्याचे सन २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या राष्ट्रीय अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्हयात डेंग्युग्रस्त १३०१ रुग्णांची नोंद होवून त्यापेकी १० रुग्णांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन, अमरावती शहर व ग्रामीण भागात डेंग्यू या आजाराचा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याने गेल्या ५ महिन्यात २१३ डेंग्यूचे पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरात डेंग्यूच्या आजारामुळे ११ जणांचा बळी गेला असतानाही शहरात औषध व धूरफवारणी करण्यात येत नाही, तसेच मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात निसर्गात बदलत्या वातावरणामुळे डेंग्यू सदृश्य रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून शासकीय रुग्णालयात विविध चाचण्यांच्या अभावामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात फैलावत असलेल्या डेंग्यू आजाराला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

विदर्भातील या सहा जिल्हयांमध्ये एकूण १३०५ डेंग्यू बाधित रुग्ण आढळले असून त्यापैकी ३ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

(३) औरंगाबाद शहरात सन २०१९ मध्ये डेंग्यू आजारामुळे २ मृत्यू झालेले आहेत. महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत ७१,६६० निवासी परिक्षेत्रात औषध फवारणी तर २७,०९४ निवासी परिक्षेत्रात धुरफवारणी करण्यात आली आहे. तसेच बहुतांश निवासी परिक्षेत्रात व्हेईकल माऊंटिंग धुर फवारणी करण्यात आली आहे. तसेच मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात सन २०१७ मध्ये-११, सन २०१८-१० तर सन २०१९ मध्ये-६ डेंग्यूचे रुग्ण आढळून आलेले आहेत.

राज्यातील डेंग्यू दुषित रुग्णांच्या निश्चित निदानासाठी ४२ सेंटिनल सेंटर्स् (प्रयोगशाळा) कार्यान्वीत असून या ठिकाणी सर्व विषाणुजन्य आजारांची मोफत तपासणी केली जाते.

(४) राज्यात किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

• आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत नियमित ताप सर्वेक्षण.

• उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.

• साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

• ताप रुग्णांचे रक्तजल नमूने घेऊन सेंन्टीनल हॉस्पीटल येथील प्रयोगशाळेत मोफत तपासणी.

• राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ४२ सेंटीनल सेंटर्सची स्थापना व डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.

• नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

• उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धूरफवारणी

• शासकीय तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे डेंग्यू रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.

• डेंगी रुग्णांना लक्षणाधारीत उपचार

• सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा

• १६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून तसेच जुलै महिना डेंग्यू विरोधी महिना म्हणून साजरा करुन जनजागृती करण्यात येते.

• शालेय डेंग्यू जागृती मोहिम.

• उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा / विभागीय / राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.

• विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धरणांना नवीन उपकरणे बसविण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) * २६३८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठी व मध्यम २९६ जुन्या धरणांमध्ये जुने दोष व त्रुटी तसेच प्रमुख ७७ धरणांमधील निम्म्याहून अधिक उपकरणे निकामी झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्यातील धरणांच्या सुरक्षेबाबत दखल घेऊन सदरहू धरणांचे दोष व त्रुटी दूर करुन व नविन उपकरणे बसविण्याकरिता तातडीने निधी उपलब्ध करुन सदरहू कामे विनाविलंब करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप शासनाने कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) धरण दुरुस्तीसाठी उपलब्ध होणा-या निधीतून धरण सुरक्षिततेच्या अनुषंगाने प्रथम प्राधान्याने कामे हाती घेण्यात येतात. उणिवा/त्रुटी दुरुस्त करुन घेण्यात येतात.

बंद असलेल्या उपकरणांच्या दुरुस्तीचे कामे व नवीन उपकरणे बसविण्याची कामे क्षेत्रिय मागणीनुसार उपकरणे संशोधन विभागामार्फत केली जातात.तसेच राज्यातील १४० प्रकल्पांचा समावेश DRIP II & III या केंद्र शासनाच्या जागतिक बँक अर्थ सहाय्यीत योजनेत करण्याचे नियोजन आहे. उपकरणे बंद असल्याने धरण सुरक्षेला गंभीर धोका झाला आहे अशी सद्य:स्थिती नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नेमण्यात आलेल्या जीवरक्षकांच्या नेमणुका रद्द केल्याबाबत

**(९) * ७ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह कोकणातील सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यटन विभागाने दिल्या असून सिंधुदुर्ग जिल्हयातील १३ समुद्रकिनारे धोकादायक असून प्रत्येक किनारी २ या प्रमाणे २६ जीवरक्षकांची नेमणूक करुन त्यांना दरमहा ६०००/- रुपये मानधन देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८९/२०१० अन्वये शासनास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण ग्रामिण पर्यटन विकास कार्यक्रम या योजनेतून माहे मार्च, २०१८ पर्यंत जीवरक्षकांना मानधन देण्यात आले असून त्यानंतर मानधन देण्यासाठी निधी उपलब्ध न झाल्याने संबंधित ग्रामपंचायतीने माहे एप्रिल, २०१८ पासून जीवरक्षकांना मानधन अदा केलेले नसल्याने, जीवरक्षकांचे मानधन व विमा संरक्षण देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक पर्यटन स्थळी लावण्यात येणारे धोक्याच्या सूचना देणारे फलक संबंधित विभागातील शासकीय यंत्रणांनी फक्त किनाऱ्यावर लावले असून बऱ्याच ठिकाणी कायमस्वरुपी फलक लावण्यात आलेले नाहीत, तसेच कोकणातील रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या तीनही जिल्हयातील जीवरक्षकांच्या नेमणुका शासनाने रद्द केल्यामुळे मागील वर्षभरापासून पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यटकांच्या सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना करण्यासह जीवनरक्षकांना नियमीत मानधन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत खरे आहे. तथापि, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.८/९/२००६ रोजीच्या शासननिर्णयानुसार जीवरक्षकांची नेमणूक करण्याचे आदेश प्राप्त होते. त्यानुसार विभागाच्या दि. २९/९/२०१६ रोजीच्या शासननिर्णयानुसार ३४ समुद्रकिनाऱ्यावर प्रती जीवरक्षक रु.६०००/- इतके मानधन देण्याचा निर्णय झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटन स्थळी धोक्याच्या सुचना देणारे कायमस्वरूपी फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यातील जीवरक्षकांच्या नेमणुका शासनाने रद्द केलेल्या नाहीत. परंतु, काही ग्रामपंचायतींचे उत्पन्न कमी असल्याने तेथील जीवरक्षकांचे मानधन देता आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) विभागाच्या दि.०३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग या ४ जिल्ह्यातील एकूण ३८ समुद्रकिनाऱ्यावरील प्रत्येकी २ जीवरक्षकांना (एकूण ७६ जीवरक्षक) प्रती जीवरक्षक रूपये ६०००/-इतके मानधन एक विशेष बाब म्हणून एकूण रू.५४,७२,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये एप्रिल, २०१८ वर्षापासून संबंधित ग्रामंपचायतींनी जीवरक्षक मानधनासाठी स्वउत्पन्नातुन तरतुद करावी असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शासनाकडून एप्रिल, २०१८ पासून जीव रक्षकांना मानधन अदा करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंळझे (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीतील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१०) * २३८ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंळझे (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीतील सावरपाडा, बंदरपाडा, नंबरपाडा, वारणापाडा, अडगापाडासह आदी आदिवासी गाव पाड्यांवर जाण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत एमएमआरडीएच्या माध्यमातून ८० लाख रुपये खर्च करुन सन २०१८ मध्ये करण्यात आलेला रस्ता वर्षभरातच माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वाहून गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निकृष्ट बांधकाम झाल्या प्रकरणी स्थानिक नागरिकांनी ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने ठेकेदाराला काळ्यायादीत टाकण्यात आले आहे काय व त्याच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे, तसेच याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) भिवंडी तालुक्यातील पिळंझे बेंदरपाडा नंबरपाडा भवरपाडा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १०० दर्जाचा असून या रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र. ०/०० ते १/६०० या पृष्ठभागाचे मजबुतीकरणाचे काम एम.एम.आर.डी.ए. बाह्य रस्ते सुधारणा अंतर्गत करण्यात आलेले आहे.

सदरचे काम अंदाजपत्रकात समाविष्ट असलेल्या बाबींनुसार दि.३०.३.२०१८ रोजी पूर्ण करण्यात आले होते. तथापि माहे जुलै व ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टीतील पुरामुळे सा.क्र. ०/७०० ते १/२०० मधील साधारणत: ३१.०० मीटर लांबीतील रस्ता वाहून गेला आहे. उर्वरीत रस्ता सुस्थितीत आहे. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या उपरोक्त रस्त्याचे काम ३०५४ २४१९ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

तसेच अतिवृष्टीमुळे रस्ता बाधित झाला असल्याने संबंधीत ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीव उपसा सिंचन (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) योजनेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * ३३१९ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडाळा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) गावाजवळ वैनगंगा नदीवर राजीव ऊपसा सिंचन योजना मंजूर करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सिंचन योजना कार्यान्वित झाल्यास या क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होऊन हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येण्यास मदत होईल, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजीव ऊपसा सिंचन योजना मंजूर असूनही अजून पर्यंत त्यावर कोणतेही काम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजना तातडीने कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

सदर योजना अन्वेषणाधीन आहे.

(२) गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा गावाजवळ वैनगंगा नदीवर राजीव उपसा सिंचन योजना प्रस्तावित असून अन्वेषणाधिन आहे व अद्याप प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आलेली नाही.

या योजनेमुळे गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्यातील एकूण ६१०४ हे. क्षेत्रास सिंचन प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर योजना अन्वेषणाधिन आहे. सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून प्रशासकीय मान्यता प्रदान केलेनंतर राज्याच्या आर्थोपाया स्थितीनुसार योजना कार्यान्वित करणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने लघु पाटबंधारे तलावाची कामे प्रि-क्वालिफिकेशन निविदा प्रक्रीयेत अर्हता न तपासता दिल्याबाबत

**(१२) * ६०२२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीला जलसंधारण महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील वर्ग-१ अंतर्गत सन २००८ ते २०१४ या कालावधीमध्ये एकूण २९ लघु पाटबंधारे तलावाची कामे देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारणाची कामे देताना निविदा प्रक्रियेमध्ये प्रि-क्वालिफिकेशन टेंडरिंग करिता अर्हता तपासणीसाठी कंपनीची गेल्या ५ वर्षातील आर्थिक उलाढाल, कंपनीची तांत्रिक क्षमता व कंपनीची यांत्रिक क्षमता तपासण्यात येत असताना सदर कंपनीची प्रि-क्वालिफिकेशन टेंडरिंग मध्ये अर्हता न तपासता सदरच्या निविदा प्रक्रियेमध्ये शासकीय अधिकारी यांनी अर्थपूर्ण व्यवहार करुन सदरची कामे देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंपनीने न केलेल्या कामाची व त्यासाठी न वापरल्या गेलेल्या मालाची खर्चामध्ये नमूद करुन त्यासंदर्भात कोणतीही माल खरेदीची देयके सादर न करता शासनाकडून करोडो रुपये प्राप्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत सन २००८ ते २०१४ या कालावधीत एकूण २४ योजनांच्या निविदांची कामे स्पर्धात्मक पध्दतीने

वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि., पुणे यांना प्रदान झालेली आहेत. या व्यतिरीक्त एक काम जलसंपदा विभागाकडून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन जलसंधारण विभागास हस्तांतरीत झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

तत्कालिन कार्यपध्दतीनुसार ज्या कामाची निविदा किंमत रुपये ३.०० कोटी पेक्षा अधिक आहे अशा कामांची निविदा कार्यवाही प्रि-क्वॉलीफिकेशन नुसार करण्यात येत होती. उपरोक्त २५ कामांपैकी १७ कामांबाबत तत्कालीन निविदा पूर्व अर्हता मुल्याकन समितीने निविदा पूर्व अर्हता तपासून शिफारस केल्यानुसार पात्र ठरलेल्या सर्व ठेकेदारांचे निविदा देकार पुस्तिका उघडून त्यातील निम्नतम देकार असलेल्या ठेकेदाराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. उर्वरित ७ कामापैकी प्रत्येक काम रुपये ३.०० कोटी पेक्षा कमी किंमतीचे असल्यामुळे तत्कालीन कार्यपध्दतीनुसार या कामांना निविदापूर्व अर्हता मुल्यांकनाची आवश्यकता नसल्याने या ७ कामांच्या निविदा स्पर्धात्मक निविदेअंतर्गत निम्नतम देकारानुसार स्वीकृत करण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही

अशा प्रकारची कोणतीही देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे असदपूर (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथील अंशतः बुडीत गावठाणातील घरे नवीन पुनर्वसित गावठाणात घेण्याबाबत

**(१३) * ५६२७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्पाअंतर्गत असदपूर व शहापूर ही दोन गावे बाधित होणार असून असदपूर येथील ग्रामस्थांच्या मागणीनुसार त्यांची घरे

बुडीत क्षेत्राच्या रेषेबाहेर काळ्या मातीच्या थरावर असल्याने प्रकल्पामध्ये पाणी जमा झाल्यास त्यांच्या घरांना धोका निर्माण होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांच्या मागणीनुसार उपाध्यक्ष विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार विशेष बाब म्हणून घरांचे पुनर्वसित गावठाणात समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे असदपूर येथील अंशतः बुडीत गावठाणातील नदीकाठावरील ७३ घरे नवीन पुनर्वसित गावठाणात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे अशंत: खरे आहे.

चंद्रभागा बॅरेज बृहत लघु प्रकल्पांतर्गत असदपुर व शहापुर ही दोन गावे बाधित होणार आहेत.

असदपूर येथील बुडीत क्षेत्राच्या रेषेबाहेरील घरांना कोणताही धोका संभवत नाही असे निदर्शनास आले आहे.

(२) आणि (३) हे खरे आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार तसेच तत्कालीन मा.उपाध्यक्ष,विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर यांची दि. १०.०१.२०१९ च्या बैठकीतील निर्देशान्वये, विशेष बाब म्हणुन असदपूर येथील बुडीत क्षेत्र रेषेबाहेरील ७३ घरांचा पुनर्वसित गावठाणामध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास दि.१२.०४.२०१९ रोजी सादर करण्यात आला होता. त्यावर महामंडळाने दि.०४.०५.२०१९ चे पत्रान्वये काही मुद्यांचे अनुपालनाकरिता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना परत केला.

तद्नंतर सदर प्रस्ताव विशेष बाब म्हणुन पुनर्वसन प्राधीकरणाकडे सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यास्तव दि. २८.०१.२०२०

रोजीच्या नियामक मंडळाच्या ७७ व्या बैठकित विचारार्थ सादर करण्यात आला आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त मान्य झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील ताकारी उपसा सिंचन योजनेची शेतकऱ्यांकडील थकीत पाणीपट्टी माफ करण्याबाबत

**(१४) * ४३८२ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील ताकारी उपसा सिंचन योजनेची शेतकऱ्यांकडे सन २००२ पासून ६४ कोटी रुपयांची पाणीपट्टी थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे प्रशासनाने ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ उता-यांवर बोजा म्हणून चढवण्यासाठी कार्यवाही सुरु केल्याने येथील शेतकऱ्यांना अनेक अडचणी येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांची थकीत पाणीपट्टी माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

रु.१०९.४६ कोटी पाणीपट्टी आकारणीपैकी सुमारे रु.४५.७८ कोटी इतकी वसूली करण्यात आली असून रु.६३.६८ कोटी इतकी पाणीपट्टी रक्कम थकित आहे. यामध्ये वीज देयकाचा समावेश आहे.

(२) नाही.

अशी कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

(३) व (४) ताकारी उपसा सिंचन योजनेची थकीत पाणीपट्टी माफ करणेबाबत कार्यवाही केलेली नाही. पाणीपट्टी माफ करणेबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जानशी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील आरोग्य उपकेंद्र बंद असल्याबाबत

**(१५) * ८० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवेली ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील जानशी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामाकरिता लाखो रुपये खर्च केलेले असताना सदरहू आरोग्य उपकेंद्र गेली अडीच वर्षे कर्मचारी नसल्याने बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य उपकेंद्र बंद असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार विनावापर पडून असलेले जानशी आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) सदर उपकेंद्रातील आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरुष) यांची बदली झाल्याने त्याठिकाणी जवळच्या उपकेंद्रातील आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरुष) यांचेकडे जानशी उपकेंद्राचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरुष) हे ते जानशी उपकेंद्रामध्ये ये-जा फिरती करीत असतात, त्यामुळे सदर उपकेंद्रामध्ये लसीकरण किंवा इतर राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व्यवस्थितरित्या राबविल्या जातात.

(३) राज्याच्या मेगाभरती-२०१९ अंतर्गत सर्व जिल्हा परिषदेकडील आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरुष) ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे झाल्याबाबत

**(१६) * ५७४३ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत नवीन रस्ता सुधारण्याची कामे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सर्व कामे निकृष्ट व दर्जाहीन झाली असल्याने स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी या विभागाचे मुख्य अभियंता, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे या तीन वर्षात झालेल्या सर्व कामांची फेर तपासणी राज्य गुण दक्षता व नियंत्रण पथका कडून करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, पुणे व राज्य गुणवत्ता पथकाने यावर काय कार्यवाही केली तसेच त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर मागणीच्या अनुषंगाने सदर कामांची फेरतपासणी करण्याबाबत राज्य गुणवत्ता समन्वयक यांना कळविण्यात आले आहे. सदर कामाची फेरतपासणी करण्याकरीता राज्य गुणवत्ता निरिक्षकांची नेमणुक केली असून दि. २५.०२.२०२० पासून त्यांचा तपासणी दौरा नियोजित आहे. तपासणीअंती प्राप्त अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे प्राथमिक आरोग्य केंद्रांची झालेली दुरवस्था

**(१७) * ६०४७ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येत असलेली वसई तालुक्यातील आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे या चार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बांधकामांना ५० वर्षांहून अधिक काळ झाला असल्याने सदर इमारती मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोग तज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ आणि इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलासीस केंद्र इत्यादी सोई-सुविधांचा अभाव आणि औषधांचा तुटवडा भासत असल्याने या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिकांनी दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

चार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामास झालेली वर्षे पुढील प्रमाणे आहेत :- आगाशी २२ वर्ष, कामण २६ वर्ष, पारोळ ३३ वर्ष आणि भाताणे ३४ वर्ष.

(२) व (३) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निकषानुसार या ठिकाणी तज्ञ डॉक्टरांची पदे मंजूर नाहीत तसेच सोनोग्राफी/एक्स-रे मशीन व डायलेसीस च्या सुविधाही उपलब्ध नसतात. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व प्रकारचा औषधसाठा मुबलक प्रमाणावर उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुसुंबा (ता.जि.धुळे) येथील ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम करण्याबाबत

**(१८) * ५५५६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसुंबा (ता.जि.धुळे) येथे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झाले असून निधी अभावी सदर ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील ट्रॉमा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून समितीच्या अहवालावर आयुक्त, आरोग्य सेवा यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. आयुक्त, आरोग्य सेवा यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर ट्रॉमा केअर युनिटबाबतचे धोरण निश्चित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील उपअभियंता, शाखा अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(१९) * ७८६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील उपअभियंता, शाखा अभियंता यांनी सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये तालुक्यात गटार, रस्ते कॉंक्रिटीकरण, देखभाल दुरुस्तीची आणि २५१५ ची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी यासाठी तेथील नागरीकांनी व सामाजिक संघटनांनी दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी पंचायत समिती माळशिरस येथे बेमुदत धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी असणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही. तथापि, क्रांतिकारी संघर्ष यांचा तक्रार अर्ज दि.०९.०८.२०१९ रोजी प्राप्त झाला होता.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडून चौकशी करण्यात आली असून, सदर प्रकरणी संबंधित अधिकारी दोषी आढळलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील शेतकरी सिंचना पासून वंचित असल्याबाबत

**(२०) * ५२९४ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील शेतक-यांच्या बांधापर्यंत पाणी पोहचण्याकरिता कालवे व वितरीका तयार करण्यात आलेल्या असतानाही देखभाल व दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने शेतकरी सिंचना पासून वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जानकी देवी बजाज ग्रामविकास संस्थैंने पाट पुनर्वसन प्रकल्प व देखभाल दुरुस्ती प्रकल्पाचे कार्य हाती घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) जानकी देवी बजाज ग्रामविकास संस्थेने Corporate Social Responsibility (CSR) निधीतून पोथरा मध्यम प्रकल्पाच्या चिचघाट वितरीकेच्या १०० हे. क्षेत्रात पाट पुनर्वसन प्रकल्पांअंतर्गत देखभाल दुरुस्तीची आवश्यक कामे माहे डिसेंबर २०१९ मध्ये पूर्ण केलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा रोहणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील भोलेश्वरी नदीवर पूल बांधण्याबाबत

**(२१) * ६५७३ श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा रोहणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील भोलेश्वरी नदीवरून नागापूर वस्तीकडे जाण्या-येण्याचे दृष्टीने नदीवर पूल होण्याकरिता पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोलेश्वरी नदीवरून नागापूर वस्तीकडे जाणाऱ्या पूल निर्मीती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) आर्वी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.३४७ अ पासून रोहणा हे गाव १२५ मीटर अंतरावर आहे. महामार्गापासून गावात जाण्यासाठी पुल अस्तित्वात आहे. रोहणा ग्रामपंचायतीमध्ये नागापूर मौजा असून तेथे ग्रामपंचायत कार्यालय आहे. नागापूर मौजा लगत राष्ट्रीय महामार्ग व गावात जाणारा रस्ता आहे.

सद्य:स्थितीत भोलेश्वरी नदीवर राष्ट्रीय महामार्गावर एक व गावात जाणाऱ्या रस्त्यावर एक असे दोन पुल अस्तित्वात आहेत. व या दोन पुलांमधील अंतर २०० मीटर आहे. प्रश्नाधीन पुल हा अस्तित्वात असलेल्या पुलापासून फक्त ६०.०० मीटर अंतरावर असल्याने येथे नव्याने पुल बांधण्याची आवश्यकता नाही.

-----------------

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथील ग्रामीण रूग्णालयाचे बांधकाम पूर्ण करणेबाबत

**(२२) * २०४९ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथे मागणी व वाढत्या लोकसंख्येनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रूग्णालयात रूपांतर करुन भुमीपूजन झाले असतानाही अद्याप रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाली येथील ग्रामीण रूग्णालयात येणाऱ्या सुधागड तालुक्यातील १०६ गावे व वस्त्या असलेल्या आदिवासी बहुल क्षेत्रातील गरीब, कष्टकरी शेतमजूर वर्गास औषधोपचारांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रूग्णालयाचे बांधकाम सुरु करुन तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) पाली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे. तेथे उपचारार्थ आलेल्या रुग्णांवर प्राथमिक उपचार केले जात आहेत.
(३) पाली ता. सुधागड ग्रामीण रुग्णालयाचे मुख्य इमारत व निवासी गाळे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारित होते. सदर अंदाजपत्रक सद्याच्या दरसूचीवर आधारित तयार करुन सादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तलयास कळविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे. सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकिय मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स ॲण्ड रिसर्च सेंटर (ता.इस्लामपूर, जि.सांगली) महाविद्यालय व रुग्णालयाच्या गैरकारभाराबाबत

**(२३) * ५६५२ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स ॲण्ड रिसर्च सेंटर (ता.इस्लामपूर, जि.सांगली) या महाविद्यालय व रुग्णालयाच्या गैरकारभाराबाबत तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार शासनाने चौकशी समिती नेमली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीमध्ये वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ.तात्याराव लहाने, जे.जे. समुह रुग्णालयाच्या पॅथॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. संजय बिजबे व जी.एस.मेडिकल कॉलेजच्या सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ.राजीव सातोसकर यांचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत समितीने सदर रुग्णालय व महाविद्यालयात केलेल्या पाहणीत ४० डॉक्टरांच्या फिंगर प्रिंन्टचे मोल्ड बनवून त्याद्वारे या डॉक्टरांच्या हजेऱ्या दाखविल्या जात असल्याचे, बोगस रुग्ण आढळल्याचे तसेच अनेक वॉर्डाना कुलूप लावून वॉर्ड बंद स्थितीत असल्याचे तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाने चौकशीस समितीस सहकार्य करण्याचे नाकारल्याचे चौकशी समितीने अहवालात नमूद करुन सदर संस्थेचे कॉलेज चालविण्याची परवानगी व प्रमाणपत्र रद्द करावे अशी शासनास शिफारस केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, अहवालात नमूद करण्यात आलेल्या शिफारशीनुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

प्रकाश इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स ॲन्ड रिसर्च सेंटर, (ता.इस्लामपूर, जि.सांगली) या खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षकांची हजेरी लावण्यासाठी बोटांचे ठसे मोल्ड तयार करुन वापरले जातात तसेच तेथे आंतररुग्ण म्हणून दाखवलेले रुग्ण त्या पत्यावर राहत नसल्याची तक्रार संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांना प्राप्त झाली होती. सदर तक्रारींची दखल घेवून संचालक यांच्यामार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत समितीने सदर रुग्णालय व महाविद्यालयाची पाहणी केली असता काही वॉर्डाना कुलूप लावून वॉर्ड बंद स्थितीत असल्याचे तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाने चौकशी समितीस सहकार्य करण्याचे नाकारल्याचे चौकशी समितीने अहवालात नमूद केले आहे.

(४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी दि.२२.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामपंचायत कोशिंबी (ता.भिवंडी, जि.ठाणे) (वाळकस) भातसा नदी पात्रात विनापरवानगी सिमेंट कॉंक्रिट बांधकाम केल्याबाबत

**(२४) * ५१७१ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत कोशिंबी (ता.भिवंडी, जि.ठाणे) (वाळकस) भातसा नदी पात्रात बेकायदा बांधकामे व बोटीसाठी सिमेंट बोगदा बनविण्याबाबत ग्रामपंचायत व भातसा प्रकल्प कार्यकारी अभियंता, जिल्हाधिकारी, ठाणे यांची कोणतीही पूर्वपरवानगी (बिनशेती आदेश) न घेता थेट नदी पात्रात सिमेंट कॉंक्रिट बेकायदा बांधकाम केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार उक्त बांधकाम निष्कासीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) व (३) या संदर्भात उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचेकडे तक्रार अर्ज प्राप्त झाला असुन, सदर ठिकाणी विना परवाना बांधकाम आढळून आल्याने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेसंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाने तहसिलदार, भिवंडी यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ढवळी (ता.मिरज, जि.सांगली) येथील ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(२५) * ५९२९ डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढवळी (ता.मिरज, जि.सांगली) येथील ग्रामपंचायतीने ११४ व्या वित्त आयोगाच्या निधीत, स्मशान भूमीच्या कामात तसेच विविध कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ढवळी ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामांत गैरव्यवहार झाला असल्याने संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आली असून याबाबत चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकरदन (जि.जालना) येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करणेबाबत

**(२६) * २१६६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन शासन निर्णय क्र:श्रेणीवर्धन-२०१६/प्र.क्र.६७/आरोग्य-४, दिनांक १७ जुलै २०१९ नुसार करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा आरक्षीत करणे, उपजिल्हा रुग्णालयासाठी बांधकाम करणे व पदनिर्मिती करणे याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने या रुग्णालयासाठी जागा आरक्षीत करुन रुग्णालयाचे बांधकाम व आवश्यक पदनिर्मीती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.१७ जुलै, २०१९ च्या शा. नि. अन्वये ३० खाटांच्या रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(३) भोकरदन उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिकच्या खाटांसाठी जागा उपलब्ध असून इमारत बांधण्याकरीता अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील लघु, मध्यम व मोठ्या सिंचन प्रकल्पातील सिंचन पाणीपट्टी थकीत असल्याबाबत

**(२७) * ५०१८ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील लघु, मध्यम व मोठ्या सिंचन प्रकल्पातील एकूण ५० कोटी ७३ लाख ८२ हजार रुपये एवढी सिंचन पाणीपट्टी थकीत असून जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची ४४ कोटी ३९ लाख रुपये पाणीपट्टी थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी थकीत असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पाणीपट्टी वसुलीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच थकीत सिंचन पाणीपट्टी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.
(२) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत मंजूर आकृतीबंधानुसार विविध संवर्गातील सिंचन व्यवस्थानाकरीता मंजूर असलेल्या पदांपैकी अंदाजे ६० % पदे रिक्त आहेत.

अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे पाणीपट्टी वसुलीसाठी पाठपुरावा कमी पडतो. तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची अनिश्चितता, शेतक-यांचे घटलेले उत्पन्न, कधी पाणी टंचाई तर कधी अतिवृष्टीमुळे शेतमालाचे झालेले नुकसान, यामुळे शेतक-यांचा पाणीपट्टी भरण्याकडे कल कमी झालेला आहे. परिणामी पाणीपट्टी थकीत राहते.

क्षेत्रिय स्तरावर उपलब्ध कर्मचारी यांच्या मार्फत पाणीपट्टी वसुलीची कामे केली जातात. वसुली पथक स्थापन करुन गावोगावी फिरुन प्रयत्न करणे. साखर कारखानाकडे पाणीपट्टी कपात करुन भरणा करावा याबाबत पाठपुरावा करणेबाबत क्षेत्रियस्तरावर प्रयत्न सातत्याने होत आहेत.

बहुतांशी सिंचन प्रकल्पात अपुरा पाणीसाठा उपलब्ध असल्याने तसेच दुष्काळद्दश्य स्थिती असल्याने लाभधारक थकीत पाणीपट्टी भरण्यास अनुत्सुक होते.
(३) संबधित अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यक्षेत्रावर वेळोवेळी बैठका आयोजित करुन पाणीपट्टी वसुलीसाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात आले आहेत.

महामंडळ स्तरावरुन देखील पत्राद्वारे पाणीपट्टी वसुली पाठपुराव्यासाठी वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अधिकारी/ कर्मचारी यांचे पाणीपट्टी वसुली बाबत दुर्लक्ष झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निळवंडे (ता.अकोले, जि.अहमदनगर) धरणाच्या कालव्यांची कामे पुर्ण करण्याबाबत

**(२८) * ३४२२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.किशोर पाटील (पाचोरा)** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे (ता.अकोले, जि.अहमदनगर) धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यासाठी शिर्डी संस्थानने ५०० कोटी रुपयांचा निधी सन २०१९ मध्ये मंजूर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच कामासाठी उर्वरित लागणारा ८०० कोटी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे काय, तसेच प्राप्त निधीच्या अनुषंगाने निळवंडे धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यांचा कामांची सुरुवात करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, निळवंडे धरणाच्या कालव्यांची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) श्री.साईबाबा संस्थान, विश्वस्त व्यवस्था, शिर्डी कड्डुन निळवंडे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांच्या विकासासाठी रू.५०० कोटी इतका निधी उसनवार तत्वावर (बिनव्याजी परत करण्याच्या बोलीवर) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्यासाठी “एक विशेष बाब” म्हणून देण्यास मान्यता देण्याबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय, दि.३०/११/२०१८ व १३/१२/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तथापि त्याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचेकडून मिळणाऱ्या निधी वितरणाविरोधात जनहित याचिका क्र. १५२/२०१८ - (श्री.संदिप विजय कुलकर्णी विरुद्ध महाराष्ट्र शासन) दाखल करण्यात आली आहे. यावरील मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निधी वितरणास मनाई केली आहे. सद्य:स्थितीमध्ये प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) नाही.

(३) केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही.

(४) शासन निर्णय दि. ०९/०९/२०१९ अन्वये प्रगतीपथावरील पाटबंधारे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी रु. १५००० कोटीचे दिर्घ मुदतीचे कर्ज घेण्यासाठीच्या ५२ प्रकल्पाच्या यादीमध्ये निळवंडे प्रकल्पाचा समावेश करणेत आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर (जि.बुलढाणा) येथील शस्त्रक्रिया कक्ष सुरु करण्याबाबत

**(२९) * २२४८ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर (जि.बुलढाणा) येथील शस्त्रक्रिया कक्ष मागील अनेक वर्षापासून बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गोरगरिब व गरजू रुग्णांना बुलढाणा, अकोला जिल्हा रुग्णालयात अथवा खासगी महागड्या रुग्णालयांमध्ये उपचार करावे लागत असल्याने त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे अत्याधुनिक सेवा सुविधा, सिटीस्कॅन मशीन उपलब्ध करण्यासह बंद असलेले शस्त्रक्रिया कक्ष तात्काळ सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथील शस्त्रक्रिया कक्षात मागील ३ वर्षापासून शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. सन २०१९-२० मध्ये ४२९ मोठया शस्त्रक्रिया व ४५१ छोट्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) उपजिल्हा रुग्णालयाच्या मानकानुसार सिटीस्कॅन मशीन मंजूर नसल्याने सदर रुग्णालयात उपलब्ध करणे शक्य नाही. परंतु, निकषानुसार अन्य उपकरणे, यंत्रसामुग्री व इतर सोयी सुविधा उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोरोना विषाणुंची लागण झालेले रुग्ण आढळल्याबाबत

**(३०) * ५२५२ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणुंची लागण झालेले ८ संशयीत रुग्ण आढळले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना विषाणुंची लागण झालेले संशयीत रुग्ण मुंबई, पुणे, नांदेड व पालघर जिल्हयातील वसई व विरार या भागात आढळले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात कोरोना या विषाणुंचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) अंशत: खरे आहे.

जानेवारी २०२० मध्ये राज्यात कोरोना विषाणू आजाराचे संशयित १५ रुग्ण आढळले. तथापि प्रयोगशाळा तपासणीत या सर्वांना कोरोना आजार नसल्याने निष्पन्न झाले.

(२) हे अंशत: खरे आहे.

हे सर्व बाधित भागातून आलेले प्रवासी असून त्यांना कोरोना विषाणूची लागण झालेली नव्हती.

(३) राज्यात कोरोना विषाणूंचा प्रार्दुभाव होऊ नये म्हणून क्रेंद्र शासनाने दिलेल्या सूचनानूसार आरोग्य सेवा संचालनालयाने दि.२२.०१.२०२० च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

• आंतरराष्ट्रीय विमानतळावर बाधित भागातील प्रवाशांची तपासणी केंद्र शासनामार्फत करण्यात येते.

• इन्फूल्यूएंझा सदृश्य रुग्ण आणि श्वसन संस्थेच्या तीव्र प्रार्दुभाव या आजाराचे सर्वेक्षण सर्व आरोग्य संस्थानी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.

• एनआयव्ही पुणे यांना रुग्ण निदानासाठी नमुने पाठवितांना ते जिल्हा शल्य चिकित्सकांमार्फत राज्य आय.डी.एस.पी. विभागाच्या अनुमतीने पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

• रुग्णालय स्तरावर संसर्ग प्रतिबंध यंत्रणा कार्यरत करण्याबाबत सर्व शासकीय आरोग्य संस्थांना निर्देशित करण्यात आले आहे.

• कोरोना रोग प्रसार कसा होता व त्यावर प्रतिबंधात्मक उपाय याबाबतचे जनतेस आरोग्य शिक्षण व प्रबोधन करण्यात येते.

• एन.आय.व्ही. पुणेसह कस्तुरबा रुग्णालय, मुंबई व आय.जी.एम.सी. नागपूर येथे करोना निदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

• राज्यात बहुतांश रुग्णालयांमध्ये विलगीकरण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

• राज्य नियंत्रण कक्षाची व समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवनाळा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३१) * ५७५३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवनाळा (ता.कळंब, जि.यवतमाळ) परिसरामध्ये पाटबंधारे लघु प्रकल्पा मार्फत परिसर दुष्काळ मुक्त व्हावा म्हणुन तलावाचे काम मंजुर करण्यात आले असून सदर मंजूर तलावाला शासनाकडून निधी मिळाला परंतु चार ते पाच वर्षाचा कालावधी होवून सुध्दा निधी अपुरा असल्याने तलावाचे काम पुर्ण झाले नसल्याचे दिनाक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धवट असलेले तलाव बांधकाम पुर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत माहे मार्च, २०१९ मध्ये मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे बैठक घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू तलावाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) देवनाळा लघुसिंचन तलाव या प्रकल्पाच्या उर्वरित कामाकरिता व मुख्य विमोचकाच्या कामाकरिता जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सुधारित तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने पुढील आर्थिक वर्षामध्ये जिल्हा नियोजन समिती (सर्वसाधारण उपयोजना) लेखाशिर्षा अंतर्गत निधी उपलब्ध झाल्यानंतर तातडीने प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गिरणा (ता.नांदगाव) प्रकल्पातून निघणारे पांझण डावा कालवा व मन्याड उजवा कालवा दुरुस्तीबाबत

**(३२) * ५७३३ श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा (ता.नांदगाव) प्रकल्पातून निघणारे कालवे अनुक्रमे पांझण डावा कालवा एकूण ५३ कि.मी. लांबीचा असून त्याद्वारे मालेगाव, धुळे, चाळीसगाव व भडगाव तालुक्यातील १२१४१ हेक्टर सिंचन क्षेत्र आहे तसेच मन्याड मध्यम प्रकल्प (ता.नांदगाव), मन्याड उजवा कालवा एकूण २० कि.मी. लांबीचा, ४७०० हेक्टर सिंचन क्षेत्र असल्याने या कालव्यांवर चाळीसगाव मतदार क्षेत्रातील २२ गावे अवलंबून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही कालव्यात बऱ्याच प्रमाणात गळती असुन बांधकामाचीही दुरवस्था झालेली असल्याने कालवा व वितरीकांच्या शेवटच्या भागापर्यंत पाणी पोहचू शकत नसल्याने पर्यायाने शेवटच्या भागातील शेतकरी पाण्यापासून वंचित राहत असून आवर्तन देखील कमी मिळतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही कालव्यांची विशेष दुरुस्ती अंतर्गत कामे होणे आवश्यक असून मन्याड कालव्याच्या सुरुवातीच्या भागातून गळती जास्त असल्याने या भागात सिमेंट कॉंक्रिट लायनिंग करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दोन्ही कालव्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) मन्याड मध्यम प्रकल्पाच्या ८ कि.मी पर्यंत आवश्यकतेनुसार काही लांबीतील भागात दगडी अस्तरीकरण करण्यात आलेले आहे. आणि सन २०१५-१६ मध्ये १३ व्या वित्त आयोगा अंतर्गत उपलब्ध निधी नुसार सदर

दगडी अस्तरीकरणास दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही कालव्यांची विशेष दुरुस्तीअंतर्गत कामे तापी पाटबंधारे विकास महामंडळास प्राप्त होणाऱ्या पाणीपट्टीतून व विशेष दुरुस्तीच्या निधीतून प्राधान्यक्रमानुसार व निधी उपलब्धतेनुसार करणेत येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे शिरवली वेलोंडेवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरण प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * १३८६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरवली वेलोंडेवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे सिमेलगत लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ४० टक्के पूर्ण झाल्यानंतर गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जनतेने सर्वतोपरी सहकार्य केले असतानादेखील प्रकल्पग्रस्तांच्या न्याय मागण्यांकडे शासनाने हेतूपूर्वक दुर्लक्ष करून सदरहू प्रकल्पाचे काम प्रलंबित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करून धरणाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) येलोंदवाडी लघु पाटबंधारे तलावाच्या भुसंपादनाच्या अडचणीमुळे सन २०१४ ते २०१७ या कालावधीत काम बंद होते, त्यानंतर काम प्रगतीपथावर असून आता डिसेंबर, २०१९ पर्यंत २५ % पूर्ण झाले आहे.

(२) सदर धरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी नवीन भूसंपादन अधिनियम-२०१३ च्या कायद्यानुसार खाजगी वाटाघाटीने थेट पध्दतीने जमीन खरेदी करुन घेवून त्याची मोबदला वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) या प्रकल्पाद्वारे नारदखेरकी, देवखेरकी व शिरवली ही ३ गावे बाधीत होत असून त्यांमध्ये एकूण ८२ कुटंबे (लोकसंख्या ४३९) आहेत.

देवखेरकी व शिरवली या गावातील ६७ घरे बाधित होत आहेत. नारदखेरकी व देवखेरकी यांचे कुटुंब संकलन रजिस्टर पूर्ण झाले आहे. नारदखेरकी प्रकल्पग्रस्तांनी जमिन स्वेच्छा घेण्याविषयी संकलन रजिस्टरमध्ये लिहून दिले आहे व देवखेरकी प्रकल्पग्रस्तांनी जमिन स्वेच्छा व घरे शासकीय पूनर्वसन असे संकलन रजिस्टरला लिहून दिले आहे. शिरवली गावाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.

धरणाचे काम प्रगतीपथावर आहे. कालवे व वितरण व्यवस्था Pipe Distribution Network (PDN) अंतर्गत असुन संकल्पनाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मान्यतेची कार्यवाही सुरू आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन तसेच पुनर्वसन/ भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन धरण पूर्ण करण्याचे नियोजन आहे..
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिध्दबेट श्री क्षेत्र आळंदी (जि.पुणे) या तिर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत

**(३४) * २८०३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभुमी सिध्दबेट श्री क्षेत्र आळंदी (जि.पुणे) या तिर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) होय.

(२) "श्रीक्षेत्र देहू आळंदी, पंढरपूर, भंडारा डोगर, पालखीतळ क्षेत्रातील मुलभूत सुविधा निर्माण करणे" या विकास आराखड्यामध्ये "सिध्दबेट स्थळाचा विकास" या अंतर्गत विविध कामांकरिता एकुण रु. १५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी पार्किंग, कुंपण भिंत, सभामंडप, दगडी पदपथ, वृक्ष लागवड इ. रु. ८.०२ कोटी किमतीची कामे पूर्ण केलेली आहेत. तसेच इंद्रायणी तीराचे उत्तरेकडील सिध्दबेटच्या बाजूच्या भिंतीचे रु. ३.७४ कोटीचे बांधकाम असे एकुण रु. ११.७६ कोटी किमतीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

सिध्दबेट परिसर सुधारणा अंतर्गत स्वच्छतागृहांची सुविधा, पर्णकुटी प्रसादालय, ध्यान मंदीर, ज्ञानेश्वर महाराज मातापिता व भावंडाचे स्मारक व माऊलीसृष्टी ही कामे पूर पातळी रेषा ब्ल्यू लाईन या प्रतिबंधित भागात येत असल्यामुळे तसेच अन्यत्र पुरेशी जागा नसल्यामुळे सदर कामे सुरू करण्यात आलेली नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील जिल्हापरिषद शाळेच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३५) * ११९५ श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील जिल्हापरिषद शाळेच्या १७० वर्गखोल्या धोकादायक तर ६२५ वर्गखोल्या पडक्या स्वरुपात असल्याचे स्ट्रक्चरल ऑडिटनुसार माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयातील भिवापूर व कुही तालुक्यात अशा धोकादायक शाळांची संख्या अधिक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी २७ कोटी खनिज प्रतिष्ठान तर १७ कोटी रुपयांची तरतूद जिल्हा नियोजन समितीमधून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

भिवापूर तालुक्यात २४ व कुही तालुक्यात २१ शाळा इमारती धोकादायक आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

जिल्हा नियोजन समिती मधून रु.१४ कोटी व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण मधुन रु.५.२७ कोटीच्या कामांचे नियोजन झालेले असून २१ कोटींची कामे जिल्हा खनिज अंतर्गत पुन:प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(४) प्राधान्याने धोकादायक शाळा इमारती ऐवजी आवश्यक वर्गखोली बांधकामे व शाळा दुरुस्ती करण्याबाबत जिल्हा नियोजन व जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अंतर्गत कामांचे नियोजन करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदर्श आंगणवाडी कीट निविदा प्रकियेत झालेला गैरप्रकार

**(३६) * १३४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श आंगणवाडी कीट निविदा प्रकियेत टेक्नोक्राफ्ट असोसिएशनने बनावट आर्थिक उलाढाल प्रमाणप्रत्र सादर करुन कंत्राट प्राप्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेक्नोक्राफ्ट असोसिएशनने सन २०१८-१९ करिता प्रोव्हिजनल अंकेक्षित ताळेबंद ३१.६८ कोटी रुपये असल्याचे युडी आय एन द्वारे केलेल्या तपासणीत उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे कंत्राट प्राप्त करुन घेणाऱ्या कंपनीवर तसेच प्रमाणपत्र प्रमाणित करुन देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच कंपनीला देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

कंपनीचे अंतिम अंकेक्षित ताळेबंद व आर्थिक उलाढालाची नोंद सनदी लेखापाल यांना यु डी आय एन वर १ जुलै, २०१९ पासून अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यानुसार लेखापरिक्षण अंतीम झाल्यानंतर संबधित सनदी लेखापाल (CA) मार्फतच सदर माहिती अपलोड करण्यात येते.

(३) स्मार्ट अंगणवाडी किटसाठी प्रकाशित ई-निविदेअंतर्गत मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएशन हे L१ निविदाधारक असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर निविदाधारकांच्या दस्ताऐवजांची तपासणी माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये करण्यात आलेली असून कंपन्यांचे लेखापरिक्षण करणेसाठी ३१ ऑक्टोंबर, २०१९ पर्यंत मुदत असल्याने सदर L१ निविदाधारकाने प्रोव्हीजनल टर्न ओव्हर प्रमाणपत्र हे सनदी लेखापाल (CA) यांच्या स्वाक्षरीने सादर केलेले असल्याने त्या आधारावर सदर निविदाधारकास तांत्रिकदृष्टया पात्र ठरविण्यात आलेले होते. त्याच सनदी लेखापालाने (CA) यु डी आय एन वर अंतिम लेखापरिक्षण झाल्यानंतरचे आर्थिक उलाढाल (Turnover) व ताळेबंद बाबतची माहिती अपलोड केलेली आहे.

तथापि, सदर कंपनीच्या अंतिम लेखापरिक्षणाअंती त्यांची सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात आर्थिक उलाढाल कमी झालेली असल्याचे निदर्शनास आल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आलेली आहे. तसेच संबधित पुरवठाधारकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. नोटीसीचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर संबधित पुरवठाधारकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशिररित्या फार्मासिस्ट नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण करणाऱ्या बोगस औषध विक्रेत्या संघटनांवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * ३७६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फार्मासिस्टच्या नोंदणी प्रमाणपत्र प्रक्रियेसह नुतनीकरण प्रक्रिया महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रियेव्दारे केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वेगवेगळ्या भागात औषधांची दुकाने सुरु करणे, फार्मासिस्टची नोंदणी प्रमाणपत्रे देण्यासाठी खासगी औषध विक्रेत्यांच्या संघटनांना अधिकार असल्याचे भासवून प्रमाणपत्रे देण्यात येणे, मुदत संपलेल्या प्रमाणपत्राच्या नुतनीकरण प्रक्रियेसाठी नियमापेक्षा जादा शुल्क घेत असल्याचे महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बेकायदेशिररित्या फार्मासिस्ट नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रक्रिया राबविणाऱ्या बोगस औषध विक्रेत्या संघटनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) नाही. सदर प्रक्रिया महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून करण्यात येते.

(२) औषधांची दुकाने सुरू करण्यास परवाने महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून देण्यात येत नाही. फार्मासिस्टची नोंदणी आणि त्याचे नुतनीकरण महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे करण्यात येते, यासाठी विहित शुल्क आकारण्यात येते. तसेच खाजगी औषध विक्रेत्यांच्या संघटनांना अधिकार असल्याचे भासवून प्रमाणपत्रे देण्यात आल्याची बाब परिषदेच्या निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भामा-आसखेड (जि.पुणे) धरणात भराव करून अतिक्रमण केल्याबाबत

**(३८) * ५९७० श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा-आसखेड (जि.पुणे) धरणात भराव करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमणामुळे धरणातील पाणी साठवण क्षमता कमी होत असतानाही याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अतिक्रमण करणाऱ्या संबंधितांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

भामा आसखेड धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये प्रथमदर्शी अंशत: अतिक्रमण केलेले दिसून आले. त्यानुसार प्रथमदर्शी दिसून आलेल्या अतिक्रमणाचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग, पुणे यांनी सदरचे अतिक्रमण तात्काळ काढण्याबाबत तहसिलदार, पुणे व संबंधित व्यक्तींना दि.०५/१२/२०१९ च्या पत्रान्वये नोटीस दिली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) भामा- आसखेड धरणाच्या बुडीत क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणाचे संदर्भात आवश्यक सर्वेक्षणाव्दारे पुर्ण संचय पातळी निश्चित करुन, तहसिलदार खेड यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविणेत आले आहे. अतिक्रमणाकडे दुर्लक्ष झालेले नसल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(३९) * ५३३० श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जिल्हा परिषद शाळेच्या दुरुस्तीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या दुरुस्तीच्या कामासाठी हजारो रुपये खर्च केला असून यात गैरप्रकार झाल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले असून वेळोवेळी तक्रार करूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघळूद (जि.अकोला) ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामात झालेली अनियमितता

**(४०) * १७२६ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघळूद (जि.अकोला) ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामात १ कोटी १७ लाख ७० हजार ४२४ रुपयांची अनियमितता झाली असून याप्रकरणी मालेगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्या तक्रारीवरुन शिरपुर पोलीसांनी सात जणांविरुध्द दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या अनियमितता प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे, तथापि वाघळूद ग्रामपंचायत अकोला जिल्ह्यात नसून वाशीम जिल्ह्यात आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी वाशीम यांचे स्तरावरील चौकशी पथकाने एकूण ६० कामांची चौकशी केली असता काही कामात आर्थिक अनियमितता झाल्याने, तत्कालीन गट विकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, शाखा अभियंता, कंत्राटी पॅनल

तांत्रिक अधिकारी, क्लार्क कम डाटा एंन्ट्री ऑपरेटर, सरपंच, ग्रामरोजगार सेवक इत्यादी विरुद्ध दि. २०.१२.२०१९ रोजी पोलीस स्टेशन शिरपूर येथे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच तत्कालीन गट विकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, शाखा अभियंता यांचेवर निलंबनाची कार्यवाही करून त्यांची खाते निहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तांत्रिक सहाय्यक, क्लार्क कम डाटा एंन्ट्री ऑपरेटर व ग्रामरोजगार सेवक यांना याप्रकरणी सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलडाणा) येथील मंजूर उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे होण्याबाबत

**(४१) * १२८१ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलडाणा) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालय म्हणून मान्यता मिळालेली असून उपजिल्हा रुग्णालय हे केवळ ५० खाटांचे असल्याने एवढ्या कमी खाटांमध्ये चिखली तालुक्यातील जनतेला आरोग्य सुविधा मिळणे शक्य होणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दर्जेदार पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने चिखली येथील मंजूर उपजिल्हा रुग्णालय हे १०० खाटांचे करण्यात येऊन त्यामध्ये सिटी स्कॅन व डायलेसिस सेंटरसह अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी लेखी पत्राद्वारे नागपूर येथील मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकी दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, अशंतः खरे आहे.

चिखली (जि.बुलडाणा) येथील ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास दि.२४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर ग्रामीण रुग्णालयामध्ये बाहयरुग्ण, आतंररुग्ण व शस्त्रक्रिया अशा आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. बेड ऑक्युपन्सी रेट १०० पेक्षा जास्त आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

(३) निधीच्या उपलब्धतेनुसार रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाची कामे हाती घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाड ते मरसूळ (ता.पुसद, जि.यवतमाळ) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४२) * २५६६ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या बांधकाम क्र. २ अंतर्गत येणाऱ्या पुसद उपविभागातील मोखाड ते मरसूळ या आदिवासीबहूल गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदार कोणताही तांत्रिक व आर्थिक मापदंड न पाळता थेट डांबराविना गिट्टा अंथरने, रस्त्याचे रुंदीकरण न करणे, बीबीएम आदी काम न करत असल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी सदर काम बंद पाडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी पुसद तालुक्यात रस्त्याच्या बांधकामाचे गैरप्रकार निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मोखाड ते मरसूळ या रस्त्याच्या कामाची चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्नांकित मोखाड पारध रस्त्याला जोडणारा मरसूळ जोडरस्ता ग्रामीण मार्ग क्र.३७ च्या १५३० मिटर लांबीतील सुधारणा करण्याचे काम आदिवासी उपयोजनेअंतर्गत मंजूर आहे. सद्यस्थितीत १५३० मीटर मध्ये बी.बी.एम, कारपेट, सिलकोटचे काम झालेले असून पुढिल काम प्रगतीत आहे.

राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी सदर कामावर दि.६.१.२०२० रोजी भेट दिली असून कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचा अभिप्राय दिला आहे. तसेच कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, यवतमाळ यांच्या शासकीय प्रयोगशाळेत करण्यात आलेली असून साहित्य चांगल्या दर्जाचे आहे.

-----------------

## साजिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा उजव्या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) * ६२४५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साजिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा उजव्या कालव्यातून शेती सिंचनासाठी ३० टक्के पाणीपुरवठा सुरु असताना गेल्या १० वर्षापासून भातसा उजवा कालव्याची दुरुस्ती व साफसफाई न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यामुळे साजिवली, खटाडी, सरलांबे, दहागाव, वासिंद या परिसरातील सुमारे २० ते २५ गावातील हरभरा, मिरची, कडधान्ये व भातपिके होत नसल्याने सदरहू शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु कालव्याची तातडीने दुरुस्ती करुन शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन रब्बी हंगामात पिकांचे उत्पादन मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

भातसा उजवा कालव्याची किमी ३३ पर्यंत मुख्य कालवा व निवडक वितरण व्यवस्थेची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच दि.२० डिसेंबर, २०१९ पासून भातसा उजव्या कालव्यात पाणी सोडण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१९-२० यावर्षी रब्बी हंगामासाठी दि.२०/१२/२०१९ पासून पाणी सोडण्यात आले आहे.

सन २०१९-२० यावर्षी रब्बी हंगामात उजव्या कालव्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे २० ते २५ गावातील शेतकऱ्यांनी भेंडी, शिमला मिरची, हिरवी लहान मिरची, मका, भात, काकडी, कारली, तोंडली, गिलकी यासारखी पिके शेतकऱ्यांनी घेतलेली आहेत.

(३) भातसा उजवा कालव्याची किमी ३३ पर्यंत मुख्य कालवा व निवडक वितरण व्यवस्थेचे दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून सिंचनासाठी आवश्यक पाणी सोडण्यात येत आसून सिंचनासाठी आवश्यक पाणी सोडण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील वैद्यकीय महाविद्यालयात झालेला गैरव्यवहार

**(४४) * ६४४१ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील शासनाच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये गेली काही वर्षे फिजिशियन व सर्जन आदि कोर्सेस शिकविले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फिजिशियन व सर्जन आदि कोर्सेस यांना अखिल भारतीय मेडिकल कॉन्सिलची मान्यता घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वैद्यकीय महाविद्यालयाच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी शासनाने डॉ.पी.टी. वाकोडे जॉइंट डायरेक्ट वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीने अहवाल शासनाला सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशी काय आहेत, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) परळ, मुंबई येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसून महानगरपालिकेचे वैद्यकीय महाविद्यालय आहे. तसेच त्याव्यतिरिक्त वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम चालविणारी कॉलेज ऑफ फिजिशियन्स ॲन्ड सर्जन्स (CPS) ही संस्था देखील परळ येथे कार्यरत आहे.
(२) 'कॉलेज ऑफ फिजिशियन्स ॲन्ड सर्जन्स' या संस्थेस इंडियन मेडिकल डिग्री ॲक्ट,१९१६ नुसार व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार वैद्यकीय अभ्यासक्रम (सीपीएस) चालविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सध्या सीपीएस संस्थेचे पदव्युत्तर पदविका/फेलोशिप अभ्यासक्रम सुरु असून त्यापैकी काही अभ्यासक्रम हे भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असून इतर काही अभ्यासक्रम हे महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियमातील तरतुदीन्वये राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार चालविण्यात येत आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे. कॉलेज ऑफ फिजिशियन्स ॲन्ड सर्जन्स (सीपीएस) या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या मान्यतेसंदर्भात समिती गठीत करण्यात आली होती.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सीपीएस संस्थेच्या अभ्यासक्रमासंदर्भात गठीत समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात विविध शिफारशी केल्या आहेत. त्यामध्ये सीपीएस संस्थेची कायदेशीर स्थिती (legal status) बाबत स्पष्टता येणे आवश्यक असणे, संस्थेच्या अभ्यासक्रमाबाबत असलेल्या न्यायालयीन प्रकरणांवर निर्णय बाकी असल्याने त्यानुषंगाने कायदेशीर मत प्राप्त करणे, संस्थेने भारतीय आयुर्विज्ञान परिषद/भारत सरकार यांची पदव्युत्तर अभ्यासक्रमास मान्यता घेणे, तोपर्यंत सीपीएस संस्थेच्या कारभारापासून राज्य शासनाने दूर

राहणे, सीपीएसला भारतीय आयुर्विज्ञान परिषद/भारत सरकारने परवानगी दिल्यानंतर राज्यशासनाच्या भूमिकेबाबत पुनर्विचार करणे, तद्नंतर सीपीएसचे सर्व प्रवेश हे नीट (NEET) परीक्षेमार्फत व प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखाली आणणे, अभ्यासक्रमांचे शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणामार्फत निश्चित करणे, सीपीएस अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत घेणे, संलग्निकरण चालू ठेवण्यासाठी पायाभूत सुविधा व मनुष्यबळ यांची वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय/महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेमार्फत नियमित तपासणी करणे, प्रवेश प्रक्रियेत संविधानिक आरक्षणाचा अवलंब करणे, निवासी डॉक्टरांना विद्यावेतन व राहण्याची व्यवस्था करणे, इत्यादी बाबींचा शिफारशीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

समितीने सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील ग्रामिण रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * ४३४५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी, आजरा, भुदरगड, चंदगड, करवीर, शिरोळ व पन्हाळा तालुक्यातील ग्रामिण रस्त्यांची महापुरा मुळे मोठया प्रमाणात हाणी झाल्यामुळे त्यांच्या दुरुस्तीकरीता कोल्हापुर जिल्हा परिषदेने ४०० कोटी रुपयांची मागणी केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील उक्त तालुक्यांमधील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

फक्त प्रश्नांकित तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मागणी शासनास सादर करण्यात आली नसून कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत रस्ते व पुल, मोऱ्या, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, आरोग्य सुविधा, शाळा, अंगणवाड्या,ग्रामपंचायती इमारती, पशुवैद्यकीय दवाखाने इ. पायाभूत सोयींच्या दुरुस्तीकरीता जिल्हा परिषदेने रु.३९९.२३ कोटींची मागणी केली आहे.

(२) व (३) राज्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधीचे वाटप रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेस रु.५१९.४३ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. ५६५.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकामास निधी मिळण्याबाबत

**(४६) * १३४४ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन झाले असून बांधकामास निधी मिळण्याबाबत मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्यापही निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर बांधकामाच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ४६ गावांना उजनी धरणाचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * ६५९३ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील कासेगाव, गेवाडी, उळेगांव, गंगेवाडी, उळेवाडी, वडजी, वरळेगांव, पिंजरवाडी, मुस्ती, बोरामणी, बक्षी हिप्परगे, मुळेगाव, मुळेगाव तांडा ही गावे अद्यापही उजनीच्या पाण्यापासून वंचित असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील ४६ गावांना उजनी धरणाचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी अनेक वर्षापासून या गावातील नागरिक संघर्ष करत असुन या पैकी ३२ गावांना पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झालेला असतानाही अद्यापपर्यंत ३२ गावांच्या पाण्याचे नियोजन पूर्णत्वास गेलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गावांना उजनी धरणाचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४६ गावांची उजनीच्या पाण्यासाठी मागणी आहे. तथापि एकूण ४६ गावापैकी ३२ गावांना पाणी देण्याचे नियोजन पूर्ण केले आहे. त्यासाठीची एकरूख उपसा सिंचन योजना व देगांव शाखा कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४६ गावापैकी एकरूख उपसा सिंचन योजनेअंतर्गत २१ गावे व देगांव शाखा कालवा अंतर्गत ११ गावे अशी एकूण ३२ गावांना पाणी देण्याचे नियोजन मंजूर आहे. उजनी प्रकल्पाचे पाणी वापराचे नियोजन पूर्ण झाल्याने उर्वरित १४ गावांसाठी उजनी प्रकल्पांतर्गत पाणी उपलब्ध होऊ शकत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किल्लारी (ता.औसा, जि.लातूर) येथे राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत आयुष रुग्णालय मंजूर करण्याबाबत

**(४८) * ४६०८ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत विविध सेवा सर्वसामान्य जनतेला उपलब्ध व्हाव्यात यासाठी लातूर जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय किल्लारी येथे मुबलक जागा उपलब्ध असल्याने जिल्हाधिकारी, लातूर यांच्या सूचनेवरून आयुष रुग्णालय, किल्लारी (ता.औसा) येथे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडे जिल्हा शल्यचिकित्सक, लातूर यांनी मान्यतेसाठी दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त व इतर रुग्णांच्या सोयीसाठी विशेष बाब म्हणून सदर आयुष रुग्णालय किल्लारी येथे मंजूर करून कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे. सदर प्रस्ताव दिनांक १३.११.२०१९ रोजी सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार या पर्यायी उपचार पध्दतीचा लाभ जास्तीत जास्त लोकांना घेता यावा म्हणून आयुष रुग्णालय ५० खाटांचे असणे आवश्यक आहे. तसेच या रुग्णालयांसाठी ६ प्रकारचे विशेषज्ञ आवश्यक आहेत. सबब, ही रुग्णालये जिल्हा मुख्यालयात घेण्याबाबत दिनांक ७.११.२०१९ रोजी निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे किल्लारी येथे आयुष रुग्णालय मंजूर करण्याचा विचार करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरूड (जि.रायगड) येथील ऐतिहासीक पद्मदुर्ग किल्ल्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४९) * ४१० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) येथील ऐतिहासीक पद्मदुर्ग किल्ल्याची अतिशय दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याच्या संरक्षक भिंती पडल्या असून सर्वत्र गवत, झाडीझुडपे वाढणे, अस्वच्छ तलाव असताना स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय नसणे तसेच किल्ल्यावर जाण्यासाठी तरंगती जेटी नसल्याने पर्यटकांची संख्या कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवभक्त, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनी किल्ल्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पर्यटनाला चालना मिळण्याच्या दृष्टीने किल्ल्याच्या देखभाल दुरूस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करण्याबाबत तसेच किल्ल्याकडे दुर्लक्ष करण्याऱ्या संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) असे निदर्शनास आले नाही.

हा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. तो केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने त्याच्या जतन दुरूस्तीची बाब भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडून हाताळण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर किल्ल्यावरील वाढलेली गवते व झाडेझुडपे काढण्याचे काम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ यांनी यापूर्वी केलेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार जतन व दुरूस्तीचे काम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण कडून करण्यात येईल.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपळगाव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील देवी प्राथमिक आरोग्य केंद्राची नविन इमारत बांधण्याबाबत

**(५०) * १४५२ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील देवी प्राथमिक आरोग्य केंद्राची नविन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय अधिकारी, यांचेमार्फत माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामाकरिता निधीची उपलब्धता करुन बांधकामास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) अशंतः खरे आहे.

पिंपळगाव (ता.मोताळा, जि.बुलढाणा) प्राथमिक आरोग्य केंद्र देवी येथील नवीन इमारतीचे ९० टक्के बांधकाम पुर्ण झाले आहे. उर्वरित बांधकामाकरीता पुरेसे अनुदान उपलब्ध असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तामसवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील भोकर नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(५१) * ५२८७ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामसवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील भोकर नदीवरील केटीवेअरची फुटून दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देवूनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर केटीवेअरच्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या संबधितांवर कारवाई करण्यासह सदर केटीवेअर तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) स्थानिक ग्रामस्थ व ग्रामपंचायत कार्यालयामार्फत सूचना मिळाल्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत तात्काळ पाहणी करुन दुरुस्ती कामाची कार्यवाही हाती घेण्यात आली व अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

(३) व (४) सदर योजनेचे दुरुस्तीचे काम जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्रस्तावित करुन कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. सदर मान्यता व निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती काम पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील वाजेघर, वांगणी खोर व शिवगंगा खोरे या उपसा जलसिंचन योजनेबाबत

**(५२) * ६००१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील वाजेघर, वांगणी खोरे व शिवगंगा खोरे या उपसा जलसिंचन योजना गुंजवणी चापेट प्रकल्पात समाविष्ट करुन त्या उपसा जलसिंचन योजनेद्वारे क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी ४० कोटीचा निधी मंजूर करुन उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने वेल्हे तालुक्यातील उपसा जलसिंचन योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/०१/२०२० रोजी झालेल्या बैठकीत चर्चा झाली आहे.

(२) अतिरिक्त पाणी उपलब्धतेच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विठ्ठलवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नसल्याबाबत

**(५३) * ४०४४ श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विठ्ठलवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र नसल्याने आजारी वयोवृद्ध व्यक्ती, महिला आणि लहान मुले यांची मोठी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक गावात आरोग्य सेवा असणे आवश्यक असताना विठ्ठलवाडी गावात एकही वैद्यकीय सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक यांनी सदर बाबतीत पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माढा तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे नाही. विठ्ठलवाडी हे गाव उपळाई खुर्द या उपकेंद्रांतर्गत येत असून या ठिकाणी नियमीत लसीकरण व आरोग्य विषयक कार्यक्रम राबविण्यात येतात.

(३) व (४) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा

तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावरुन सुरु असून विठ्ठलवाडी (ता.माढा, जि सोलापूर) येथे उपकेंद्र स्थापन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तापी नदीचे पाणी पूर्ण क्षमतेने अडविण्यासाठी सिंचन प्रकल्प उभारण्याबाबत

**(५४) * २६३९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात तापी नदीच्या खोऱ्यातून सन १९६२ मधील अय्यंगार समितीने अहवालानुसार नदीच्या पाणी वाटपाच्या सुत्राप्रमाणे महाराष्ट्र राज्याला हिश्याप्रमाणे मिळणाऱ्या १९१ टी.एम.सी. पाण्यापैकी महाराष्ट्र सरकार जेमतेम ९० टी.एम.सी. पाणी अडवून वापर करीत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने जळगांव, धुळे, नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीचे पाणी पूर्ण क्षमतेने अडविण्यासाठी अद्याप एकही सिंचन प्रकल्प न उभारल्यामुळे तापी खोऱ्याचे सुमारे १०० टी.एम.सी. पाणी गुजरात राज्य महाराष्ट्र राज्याच्या हिश्याचे आजतागायत वापरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र शासनाने गुजरात राज्यात वाहून जाणारे पाणी पूर्ण क्षमतेने अडविण्याच्या दृष्टीने धरण प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच त्याकरिता शासनाने किती निधीची तरतुद उपलब्ध करुन दिली आहे,

(४) अद्याप याबाबत शासनाने कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

उकाई तांत्रिक समितीने (अय्यंगार समिती) जाने. १९५८ मध्ये तापी खोऱ्यातील उपलब्ध पाण्याच्या वाटपाबाबत अभ्यास केला आहे. त्यानुसार ७५% विश्वासाहर्तेनुसार ४०० अघफु पाणी तापी खोऱ्यात उपलब्ध आहे. त्या पाण्याचे वाटप हे गुजरात राज्यास १३८.६० अघफु, महाराष्ट्र राज्यास १९१.४० अघफु व उर्वरीत ७० अघफु मध्यप्रदेश राज्यास याप्रमाणे देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रातील तापी नदी खो-यात जलसंपदा विभागाचे ४२० प्रकल्प पूर्ण झाले असून त्यात ३३७६.११५ द.ल.घ.मी. (११९.२१ अ.घ.फु.) पाणीसाठा झालेला असून त्याचा वापर सुरू आहे व ७० प्रकल्पात ११३१.५१८ द.ल.घ.मी. (३९.९५ अ.घ.फु.) पाणीसाठा निर्माण झालेला असून त्या प्रकल्पांची वितरण प्रणालीची कामे प्रगतीत आहेत. एकूण (३३७६.११५ + ११३१.५१८ = ४५०७.६३३ दलघमी) १५९.१६ अ.घ.फु. पाणीसाठा निर्मिती झालेला असून उर्वरीत ६१ प्रकल्पांचा पाणीसाठा निर्मिती व वितरण प्रणालीची कामे प्रगतीत आहेत.

अशा प्रकारे महाराष्ट्राच्या हिश्याचे १९१.४० अ.घ.फु. पाण्याचा पूर्ण वापराचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन जेमतेम ९० टीएमसी पाणी वापर करीत आहे ही बाब खरी नाही.

(२) नाही.

एकात्मिक राज्य जलआराखडयातील तापी खो-यामधील पाणीसाठा व वितरण कामे प्रगतीत असलेल्या ६१ प्रकल्पांतर्गत २५६८ द.ल.घ.मी. (९० अ.घ.फु.) पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत काही प्रकल्प बांधकामाधीन असून ९० अ.घ.फु पाण्यापैकी भविष्यकालीन योजनांकरीता ही नियोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या हिश्याचे संपूर्ण पाणी अडविले जाईल.

एकात्मिक राज्य जलआराखडयातील तापी खो-यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांच्या पाणीसाठा निर्मितीचे काम प्रगतीत असल्याने व मध्यप्रदेशच्या हिश्याचे ७० अ.घ.फु. पाणी वापराचे नियोजन मध्य प्रदेश सरकार कडून झालेले नसल्याने सदर पाणी खाली वाहून येत आहे. त्यामुळे तापी खोऱ्याचे सुमारे १०० टीएमसी पाणी गुजरात राज्य महाराष्ट्र राज्याच्या हिश्याचे आजतागायत वापरत असल्याचे बाब खरी नाही.

(३) तापी खोऱ्यामध्ये उपलब्ध असलेल्या महाराष्ट्राच्या वाटयाच्या पाण्याचे नियोजन करणेत आले आहे. त्या अनुषंगाने बांधकामाधीन तसेच भविष्यकालीन प्रकल्पांसाठी राज्याच्या आर्थोपायी परिस्थिती नुसार उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार पाणी अडविणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) उपरोक्त नुसार कार्यवाही प्रगतीत आहे. तथापि नियोजनानुसार प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, भूसंपादनातील अडचणी, वन जमीन उपलब्धता इ. मुळे प्रकल्प पूर्ण होणेस विलंब होत आहे.

-----------------

## ऐनारी तलाव (जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पाच्या सिमेंट ग्रावणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५५) * ६२१३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐनारी तलाव (जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पातून खालच्या बाजूने पाणी झिरपू नये यासाठी श्रीराम असोसिअट या कंपनीने प्रकल्पाच्या पायथ्याशी १० मीटर पर्यंत सिमेंट ग्रावणाचे काम केले असून या कामासाठी सदरहू कंपनीला ३० कोटी ९६ लाख ५ हजार ३६४ रुपयांची रक्कम अदा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामाचे मोज माप न करता निविदामधील अटी व शर्थी न तपासता अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने रक्कम अदा केल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकारणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) अशंतः खरे आहे.

ऐनारी तलाव (जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पातून खालच्या बाजूने पाणी झिरपू नये यासाठी जलरोधीचरात सिमेंट ग्रावणाची उपाययोजना करणे आवश्यक

असल्याचा अहवाल वरिष्ठ भूवैज्ञानिक, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी दिला होता. यास्तव सदर सिमेंट ग्रावणाची उपाययोजना करणेचे रु.३ कोटी ३४ लक्ष इतक्या रकमेचे काम अतिरिक्त बाब म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने हाती घेण्यात आले. सदर कामाची मोजमापे घेऊन दुसऱ्या व तिसऱ्या चालू देयकात निविदेमधील अटी व शर्तीना अधिन राहून कामाची रक्कम संबधित ठेकेदारास अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्बवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील टेंभू उपसा जलसिंचन योजना पुरेशा निधीअभावी रखडल्याबाबत

**(५६) * ५०७२ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील टेंभू उपसा जलसिंचन योजना पुरेशा निधीअभावी रखडली असून त्यामुळे तेथील ८० हजार हेक्टर शेती क्षेत्र सिंचनापासून कायम वंचित राहिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, येथील कडेगांव तलाव या योजनेच्या लाभक्षेत्रात यावा यासाठी प्रतिवर्षी वारंवार संतप्त शेतक-यांकडून मोर्चे निघत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी निधीची तरतूद करुन सदरहू योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच कडेगाव तलाव या योजनेच्या लाभक्षेत्रात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असून, प्रकल्पीय ८०,४७२ हे. सिंचन क्षेत्रापैकी जून, २०१९ अखेर ३८,२९९ हे. सिंचन क्षेत्र निर्मिती झाली आहे व उर्वरीत कामे नियोजनानुसार प्रगतीपथावर आहेत.

(२) होय.

(३) टेंभू उपसा सिंचन योजनेचा केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेतंर्गत समावेश असून प्रकल्पाच्या कामास नियोजनानुसार निधी उपलब्ध आहे व प्रकल्पाची कामे जून, २०२० अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

कडेगाव तलाव हा १९७५ साली पूर्ण झालेला, ४२४ हे. लाभक्षेत्र असलेला पूर्णत: वेगळा प्रकल्प आहे. त्यामुळे कडेगाव तलावाच्या लाभक्षेत्राचा समावेश टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रात करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील एकूण ४६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रापैकी १५ उपकेंद्राना स्वमालकीची इमारत नसल्याबाबत

**(५७) * २१७ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील एकूण ४६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रापैकी सुमारे १५ उपकेंद्राना स्वमालकीची इमारत नसल्याने आरोग्य उपकेंद्र भाडयाच्या अथवा ग्रामपंचायतीच्या इमारतीत सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकेंद्राच्या स्वमालकीच्या इमारती नसण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपकेंद्रांना स्वमालकीची इमारत बांधण्यासाठी शासनाने निधी मंजूर केला आहे काय व किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त उपकेंद्रांच्या इमारतीचे काम तातडीने पूर्ण होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) सदर १५ उपकेंद्रापैकी १ उपकेंद्राला जागा उपलब्ध असून ४ उपकेंद्रांना जागा बक्षिसपत्राद्वारे उपलब्ध करून घेणेबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच उर्वरित १० उपकेंद्रांना जागा उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा सुरू असून सद्यस्थितीत ते भाड्याच्या जागेत सुरू आहेत.

(३) व (४) सदर १५ उपकेंद्रापैकी १ उपकेंद्राला (उपकेंद्र डोंगर, ता.राजापूर) जागा उपलब्ध झाल्याने जिल्हा वार्षिक योजना २०१९-२० अंतर्गत कामाला रक्कम रू.३०.०० लक्ष मंजूर झालेले असून या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर उपकेंद्र इमारतीच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. इतर उपकेंद्रांना जागा उपलब्ध झाल्यानंतर इमारत बांधकामाची कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळशिरस (जि.सोलापूर) येथे पाझर तलावांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५८) * ७८९ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु पाटबंधारे उपविभाग (ता.माळशिरस, जि.सोलापूर) यांच्यावतीने कण्हेर (सरगरवाडी) येथे पाझर तलावाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असुन या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणे, सदर कामाची लांबीरुंदी कमी असणे, तसेच कामासाठी निकृष्ट दर्जाची माती, खडी व मुरुम वापरुन या कामात उपअभियंता,कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता व ठेकेदार यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळशिरस तालुक्यात इतरही गावात अशाच प्रकारची कामे झालेली असून तालुक्याच्या पंचायत समिती सदस्यांच्या गावातही निकृष्ट दर्जाची पाझर तालावांची कामे करुन तेथील अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत नागरीकांनी व पदाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर, जिल्हाधिकारी सोलापूर, कार्यकारी अभियंता

लघुपाटबंधारे, जि.प.सोलापूर यांच्याकडे सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) सदर कामाची नवजीवन ग्रामविकास प्रतिष्ठाण गुंजेगाव ता.मंगळवेढा या त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवालात सदर काम चांगले झाले असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट (जि.वर्धा) येथे ट्रॉमा केअर युनिट सुरु करणेबाबत

**(५९) * ५३०४ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट (जि.वर्धा) येथील ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम ३ वर्षापूर्वी पूर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणघाट शहर राष्ट्रीय महामार्ग क्र.७ वर असून या मार्गावर दररोज जवळपास १० हजार वाहनांची वाहतुक होत असून या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असताना ट्रॉमा केअर युनिट सुरु नसल्याने अपघातातील रुग्णांना इतरत्र ठिकाणी उपचारासाठी घेऊन जाताना मृत्यू होतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी प्रस्ताव सादर केला असुन याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनीही वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याबाबत मा.वित्त व नियोजन मंत्री यांनी देखील तज्ञ डॉक्टर, सिटीस्कॅन, आवश्यक मशीन व औषध साठा पुरवून हे युनिट कार्यान्वित करण्याबाबतचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदरहू ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर ट्रॉमा केअर युनिट येथील शस्त्रक्रियागृह हे उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट येथील मनुष्यबळ व साधनसामुग्रीचा उपयोग करुन अंशत: कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) शासनाकडुन सदर ट्रॉमा केअर युनिटच्या आकृतीबंधानुसार १० पदांपैकी ५ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही व उर्वरित साधनसामुग्री पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मौजा थार-बोरखेडी-चामला (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे जाम नदीवर मिनी डॅमची निर्मिती करण्याबाबत

**(६०) * ६५८२ श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा एकांबा-पार्डी (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील नवनिर्मित भिकाजी मिनी डॅम तसेच मौजा थार-बोरखेडी-चामला (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे जाम नदीवर विशेष बाब म्हणून मिनी डॅमची निर्मिती करण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा पार्डी, एकांबा, बोटोणा, सारवाडी व पालोरा (ता.कारंजा) मौजा चामला, बोरखेडी, थार व बांबर्डा (ता.आष्टी) ही गांवे बारमाही पाणी टंचाईची असून येथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी डॅम निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे. ग्राम पंचायत थार यांनी त्यांचे निवेदन दि.१७/१२/२०१२ व दि. ११/१२/२०१४ अन्वये तत्कालीन मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांना जाम नदीवरील, जाम प्रकल्पाच्या अन्वेषणाच्या अनुषंगाने मंजुरी देण्याची मागणी केली आहे.
(२) पाणीटंचाईबाबत मा.आ.श्री.दादाराव केचे (आर्वी विधानसभा मतदार संघ) यांनी त्यांचे दि.११/१२/२०१४ चे पत्रा नुसार तत्कालीन मा. मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य यांना अवगत केले होते. वर्धा जिल्हातील कोणतेच क्षेत्र अवर्षण प्रवण क्षेत्रात समाविष्ट नाही.
(३) व (४) जाम नदीवर बोरखेडी येथे तलावाची मागणी असलेले क्षेत्र उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात येते व या भागात नवीन प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध नाही. सदर बाब प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र.२८२२, दि.०६/०८/२०१३ अन्वये ग्रामपंचायत थार ता.आष्टी यांना कळविण्यात आली आहे.

-----------------

## रायगड मधील पाली शहरातील अरूंद रस्ते व अष्टविनायक मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(६१) * २०५७ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड मधील पाली शहरातील अरूंद रस्ते व अष्टविनायक मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी यामुळे स्थानिक व भाविकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना म्हणून पाली गावाला बाहय वळण (बायपास) रस्ता करण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला व उक्त निर्णयाची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

पाली शहरातील वाहतुक समस्येमुळे येथील रस्ते हे एकेरी करण्यात आलेले असून श्री बल्लाळेश्वर मंदिर येथे व विळे भागाड माणगावकडे जाणा-या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, त्यामुळे पाली शहरातील वाहतुक समस्या ही जटील होत चाललेली आहे. वाहतुक समस्येचा स्थानिक प्रवाशांना तसेच भाविकांना त्रास न होणेकरिता शहरातील महत्वाचे नाके येथे प्रशासनाकडून वाहतुक पोलीस कर्मचारी यांची नेमणुक करण्यात येत असते.

(२) पाली शहरास वर्तुळाकृती बाहयवळण रस्ता असा रस्ता कोणत्याही योजनेतुन मंजूर नाही. परंतु, पाली पाटणुस रस्ता रा मा. ९४ या रस्त्यास पर्यायी रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत प्रस्तावित आहे. पाली पाटणुस रस्त्यास पर्यायी पाली गांवातून वळणरस्ता करणे कि.मी.००/०० ते ३/०० या कामाकरिंता जमिन भूसंपादन करणे या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

पाली गावास पाली पाटणुस रस्ता रा. मा. ९४ या रस्त्यास पर्याय रस्ता करणे या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त असून, सदर कामासाठीं लागणाऱ्या जागेची भुसंपादन प्रक्रिया सुरु आहे. भुसंपादन करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही शक्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिसोडा (बुद्रुक) (ता.भोकरदन, जि.जालना) येथील आरोग्य उपकेंद्र १२ वर्षांपासून बंद असल्याबाबत

**(६२) * ३९८० श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिसोडा (बुद्रुक) (ता.भोकरदन, जि.जालना) येथील लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेले आरोग्य उपकेंद्र हे गेल्या १२ वर्षांपासून बंद असल्याने एक बेवारस इमारत समजली जात असून परिसरातील गरीब, गरजू रुग्णांसाठी सदर आरोग्य उपकेंद्र उपयुक्त असल्याकारणाने ते पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची मागणी परिसरातील जागरूक नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्थाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.ग्रामविकास

मंत्री, जालन्याचे मा.पालकमंत्री, जिल्हाधिकारी,जालना, जिल्हा व तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यात्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्रामध्ये सर्वत्र कचरा, घाण पसरली असून इमारतीतील साहित्यांची अज्ञातांकडून मोडतोड करण्यात आली असल्याने दरवाजे उखडले आहेत, आवार भिंत कोसळली आहे, लोखंडी गेट सडले आहेत, फरशा उखडल्या आहेत, लाईट फिटींग निघाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे या उपकेद्राची दुरवस्था झाल्याचे स्थानिक जबाबदार व्यक्तींनी याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन हिसोडा (बुद्रुक) येथील आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत तसेच यास जबाबदार असणारे संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

दिनांक २०.०२.२०२० रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना तसेच तालुका आरोग्य अधिकारी, भोकरदन यांनी उपकेंद्रास भेट देऊन इमारतीच्या परिसरातील अस्वच्छता दूर केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करुन कर्मचारी सेवा देत आहेत. सदर उपकेंद्राच्या बांधकामाच्या विलंबाबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग यांचेकडून खुलासा/अहवाल मागविण्यात आलेला आहे तसेच उपकेंद्राच्या दुरावस्थेसाठी तत्कालीन वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात येऊन खुलासा मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पन्हाळजे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत

**(६३) * १३८९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पन्हाळजे (ता.खेड, जि.रत्नागिरी) गाव अत्यंत दुर्गम व तालुक्याच्या ठिकाणापासून सुमारे ५० किलोमीटरवर असून जवळपास कोणतीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे पन्हाळजे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे यासाठी जागेच्या उपलब्धतेसह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत शासनाकडे पाठविण्यात आला असून या आरोग्य केंद्रासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देखील दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी वा त्यानंतर सातत्याने पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे पन्हाळजे येथे उपकेंद्र कार्यरत आहे व उपकेंद्रामार्फत तेथील जनतेला वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे पन्हाळजे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची बाब लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने बृहत आराखडयात प्रस्तावित केले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतक-यांना गोसीखुर्द धरणाच्या कालव्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(६४) * २८०६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतक-यांना गोसीखुर्द धरणाच्या कालव्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) पोंभुर्णा शहर व देवाडा-खुर्द केमारा जिल्हा परिषद क्षेत्र गोसीखुर्द प्रकल्पाच्या अधिसूचीत लाभक्षेत्राच्या बाहेर आहे तसेच याक्षेत्रात सिंचनाकरीता पाणी उपलब्ध करून देणे गोसीखुर्द प्रकल्पाच्या नियोजनात नसल्यामुळे सिंचनाकरीता पाणी उपलब्ध करून देणे शक्य नाही. सदर क्षेत्राच्या सिंचनाकरीता वेगळ्याने पर्यायी प्रकल्प हाती घेणे योग्य राहील, असे सहा.अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर यांनी दिनांक १२.०२.२०२० च्या पत्रान्वये मा.विधानसभा सदस्य यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कंत्राटी डॉक्टरांना वेतन वेळेत मिळण्याबाबत

**(६५) * १३०७ श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम),**

**ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामिण व दुर्गम भागातील जनतेला वेळेत उपचार मिळावे यासाठीआरोग्य सेवा संचालनालयाने प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये कंत्राटी पध्दतीने १३०० डॉक्टरांची नियुक्ती केली असून सदरहू डॉक्टरांना मागील ६ महीन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली, नंदुरबार, रत्नागिरीसह राज्याच्या दुर्गम भागात अत्यल्प वेतनावर काम करणाऱ्या आरोग्य विभागाच्या ५० टक्के डॉक्टरांनी वेळेवर वेतन मिळत नसल्याने राजीनामे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू डॉक्टरांना वेतन न मिळण्यास जबाबदार असणाऱ्या संबधीतांवर कारवाई करण्याबाबत तसेच थकीत वेतन तात्काळ देण्यासह यापुढे वेळेत वेतन मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१)/सेवा-३, दि.३/१२/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ११ महिन्यांसाठी १७८४ कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) १०- कंत्राटी सेवा या बाबीअंतर्गत पुरवणी मागणी मंजुर होईपर्यन्त राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत शिल्लक निधीतून कंत्राटी वैदयकीय अधिका-यांना संचालनालय स्तरावर मानधन देण्यात आले आहे. सन २०१९

च्या हिवाळी अधिवेशनात एकुण रु. ५६ कोटींची पुरवणी मागणी मंजुर झाली असून त्यानुसार दि.३१.०१.२०२० रोजी सर्व उपसंचालकांना कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना मानधन अदा करण्यासाठी निधी वितरीत केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राशीन-अळसुंदे-निंबे (ता.कर्जत, जि.अहमदनगर) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(६६) * १९७ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राशीन-अळसुंदे-निंबे (ता.कर्जत, जि.अहमदनगर) या सुमारे १२ कि.मी. रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम प्लॅन एस्टिमेटनुसार होत नसल्याबाबत तसेच सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत ग्रामस्थांनी संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीस अनुसरुन या रस्त्याची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुणवत्ता व नियंत्रण पथकाद्वारे करण्यात आली आहे काय, त्यानुसार रस्त्याच्या कामात उणिवा अथवा त्रुटी आढळून आल्या आहेत काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

सदर काम जुलै २०१९ मध्ये पुर्ण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) या योजनेंतर्गत मंजूर कामांची तपासणी करण्याची स्वतंत्र त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित आहे. सदर कामाची २ राज्य गुणवत्ता निरिक्षक व १ वरीष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी वेळोवेळी तपासणी केली आहे. सदर तपासणीत उणिवा अथवा त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. तथापि सदर रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर मोठया प्रमाणावरील अवजड वाहतुकीमुळे रस्ता ठिकठिकाणी खराब झाला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात ग्रामपंचायतीच्या विकासाकरीता मिळालेल्या निधीत झालेला गैरव्यवहार

**(६७) * २७२५ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात ग्रामपंचायतीच्या विकासाकरीता १४ व्या वित्त आयोग, म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजना, दलित वस्ती, तांडा वस्ती, जनसुविधा आदि योजनांच्या मिळालेल्या निधीत गैरव्यवहार झालेल्या कामांची १५५७ प्रकरणे उघडकीस आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका यवतमाळ १४४ प्रकरणे, कळंब २९, बाभुळगांव १००, नेर ८०, दारव्हा ४६, आर्णी ११९, दिग्रस ३०, पुसद ११८, महागांव ९३, उमरखेड १०८, घाटंजी ६८, राळेगांव १५८, पांढरकवडा १८१, मारेगांव ८७, झरी ११३, वणी ८३ असे एकूण १५५७ प्रकरणांमध्ये ३२ कोटी ६५ लाख ४५ हजार ६०० रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमरखेड येथील १०८ प्रकरणांचा चौकशी अहवाल गटविकास अधिकारी यांनी पाठविला नसल्याने पंचायत विभागाकडे नोंद नसून तब्बल २ कोटी १३ लाख ४० हजार २८६ रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशता खरे आहे. लेखापरिक्षण अंती सामान्य निधी,जरोयो, जग्रासंयो, संग्रारोयो निधीची १५५७ अफरातफर प्रकरणे उघडकीस आली आहेत. यामध्ये मग्रारोह योजनेच्या प्रकरणाचा समावेश नाही.
(२) हे खरे नाही, तथापि यवतमाळ जिल्हयातील १६ तालुक्यातील ग्रामपंचायती मधील लेखापरिक्षण अंती सामान्य निधी, जरायो निधी, जग्रासयो निधी, संग्रारोयो निधीची एकूण १५५७ अफरातफर प्रकरणे उघडकीस आली असून त्यापैकी ७३४ अफरातफर प्रकरणांची प्राथमिक चौकशी केली असून त्यामध्ये रु. १६,७४,५७,७५५/- इतकी रक्कम गुंतलेली आहे. सदर ७३४ प्रकरणात रु.१०,५४,२३,३६३/- चौकशी अंती समायोजित झाली आहे.व रु.६,२०,३४,३९२/- वसूलीस पात्र असल्याचे दिसून येते. सदर वसूलपात्र रकमेपैकी रु.४६,३७,९१७ /-वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम रु.५,७३,९६,४७५/- शिल्लक रकमेबाबत वसुलीची कार्यवाही सुरु आहे.तसेच ८२३ प्रकरणे चौकशी करीता प्रलंबित आहेत. त्यामध्ये रु.१९,६७,३५,७४१/- इतकी रक्कम गुंतलेली आहे. सदर प्रलंबित सर्व प्रकरणांची चौकशी सुरू असून ती तातडीने पुर्ण करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) हे खरे नाही, तथापि पंचायत समिती, उमरखेड कडे १०८ प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ८१ प्रकरणाची प्राथमिक चौकशी पुर्ण झाली आहे. त्यामध्ये रु.१,१४,७७,५५०/- रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी रु.९०,६६,३७७/- समायोजित झाली असून रु.२४,११,१७३/- वसूलीस पात्र असल्याचे आढळून आले. त्यापैकी रु.२,२७,९८०/- वसूल करण्यात आली व रु.२१,८३,१९३/- वसूली करीता शिल्लक आहे. त्याबाबत वसूलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच २७ प्रकरणे चौकशी करीता प्रलंबित असून त्यामध्ये रु.१,०८,७१,०७३/- इतकी रक्कम गुंतलेली आहे.सदर प्रलंबित प्रकरणांची प्राथमिक चौकशी सुरू आहे.
(४) होय, १५५७ प्रकरणांपैकी ७३४ प्रकरणांची चौकशी पुर्ण झाली असून उर्वरीत प्रकरणात चौकशी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) काही प्रकरणांत संबंधित ग्रामसेवकांवर वार्षिक वेतनवाढ रोखणे, ताकीद देणे, कारणे दाखवा नोटीस देणे बाबत कार्यवाही करण्यात आली आहे. उर्वरीत प्रकरणात संबंधित ग्रामसेवक व ग्रा.वि.अ. यांचेवर खाते चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच निलंबनाची सुध्दा कार्यवाही करण्यात आली आहे. उर्वरीत प्रकरणात चौकशी पुर्ण होताच त्याप्रमाणे संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांची सुरक्षा करण्याबाबत

**(६८) * ४३४६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा, राधानगरी, पाटगाव, तुळशी, कुंभी-कासारी यासह अन्य सिंचन प्रकल्पांवर सुरक्षारक्षक, पथदिवे व सिसिटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे धरणांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या धरणांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

दुधगंगा, राधानगरी, या मोठ्या प्रकल्पांवर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर (गृह खाते) यांचेमार्फत सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेली आहे.

पाटगाव, तुळशी, कुंभी व कासारी या व अन्य सिंचन प्रकल्पांवर मंडळांतर्गत संबंधित विभागातील कार्यरत असणाऱ्या बाह्य अभिकरणामार्फत निविदाद्वारे कार्यरत सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून धरणांची सुरक्षा करण्यात येते.

दुधगंगा, राधानगरी, या प्रकल्पांवर पथदिवे व सिसिटिव्ही बसविलेले आहेत. पाटगाव, कुंभी व कासारी या मध्यम प्रकल्पांवर पथदिवे बसविलेले आहेत. इतर बसविणेची कार्यवाही करणेत येत आहे.

तथापि, धरणांच्या सुरक्षेशी संबंधीत कोणतीही गैरबाब निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) आवश्यकतेनुसार या धरणांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सिसिटीव्ही, पथदिवे व बाह्यअभिकरणामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यात अत्याधुनिक सुविधांसह सुसज्ज रूग्णालय उभारण्याबाबत

**(६९) * २४२८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात १० वर्षापूर्वी १०० खाटांचे अत्याधुनिक शासकीय रूग्णालयाला मान्यता शासनाकडून देण्यात आली असून सदर रूग्णालय उभारण्यासाठी द्रोणागिरी विभागामध्ये सिडको प्रशासनाकडून भूखंड ही देण्यात आलेला असताना अदयाप या कामाला सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात अत्याधुनिक सुविधांनी उपयुक्त असे रूग्णालय नसल्यामुळे रूग्णांना उपचारासाठी पनवेल, नवी मुंबई व मुंबई येथे जावे लागत असल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून लांबच्या प्रवासामुळे अनेक रूग्णांना जीवही गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उरण तालुक्यातील रूग्णांना अत्याधुनिक सोईसुविधांनी सुसज्ज असे रूग्णालय तातडीने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदरील रुग्णालय सीएसआर माध्यमातून निधी उभारुन बांधकाम करण्यास दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सीएसआरच्या माध्यमातून निधी मिळविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

सध्यस्थितीत उरण येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत असुन रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सेवा नागरिकांना पुरविण्यात येत आहेत.

उरण येथील ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुपांतर करण्यास दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील माढा, पंढरपूर, सांगोली, माळशिरस व मंगळवेढा या तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेत झालेला गैरव्यवहार

**(७०) * ४९७२ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील माढा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस व मंगळवेढा तालुक्यात सन २०१६-२०१७, २०१७-२०१८ आणि २०१८-२०१९ मध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या कामात तेथील कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी ठेकेदाराशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाची कामे करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील नागरिकांनी, संबंधित तालुक्यातील जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिति येथील पदाधिकारी यांनी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग आणि राज्य शासनाकडे सन २०१८-२०१९ मध्ये तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे तत्कालीन जलसंधारण मंत्री यांनी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) अशी बाब आढळली नाही.

(४) मौ.कण्हेर येथील पाझर तलाव दुरूस्तीच्या कामाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवालात सदर काम चांगले झाले असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

मौजे खंडाळी येथील सिमेंट बंधाऱ्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने उप अभियंता लघु पाटबंधारे विभाग, उपविभाग पंढरपूर व उप अभियंता लघु पाटबंधारे विभाग, उपविभाग मोहोळ यांचेमार्फत सदर बंधाऱ्याची संयुक्तरीत्या तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवालात कामाचा दर्जा चांगला असल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर कामाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी केली असून तपासणी अहवालात सदर काम समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.

मौजे बागेचीवाडी येथील तक्रारीच्या अनुषंगाने सिमेंट बंधाऱ्याच्या संधानकाच्या पडदीचे काम (जॅकेटींग) कंत्राटदाराने पूर्ण करून दिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील भुंडा पुल धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(७१) * १९८८ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील भोगावती नदीवरील पेण-तरणखोप-पनवेल तसेच पेण-खोपोलीकडे जाणाऱ्या भुंडा पुलावर संरक्षक कठडे, कुठलाही संदेश

देणारे फलक नसल्याने, पुलाचा काही भाग निखळून पडल्याने पुलाची दुरवस्था झालेली असता वाहने व पादचाऱ्यांना दैनंदिन प्रवास करणे अत्यंत गैरसोयीचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलाची दुरुस्ती किंवा नवीन पुल बांधण्याची ग्रामस्थांनी मागणी करुनही याकडे दुर्लक्ष व विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतुकीकरीता धोकादायक झालेल्या सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही. पेण बोरगाव या इतर जिल्हा मार्ग क्र.५६ वर प्रश्नांकित पुल आहे. सदरचा पुल हा Submersible स्वरुपाचा आहे. पुलाच्या दोन्ही बाजूस पुल अरुंद असलेबाबतचा नामफलक लावण्यात आलेला आहे. २०१९ च्या अतिवृष्टीमुळे पुलावरील डांबरी पृष्ठभाग खराब झालेला होता, परंतु आता रस्त्याची डागडुजी करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(२) व (३) अशी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, भुंडा पुलाच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव पुरहानी कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरणाच्या कामाबाबत

**(७२) * २००९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पंचक्रोशीतील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी ढाकमोली येथे धरण बांधण्यासाठी सन २००६ ते २००९ या कालावधीत शासनाकडून सर्व्हे करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या कामाला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे आहे.

ढाकमोली येथे धरण बांधण्यासाठी सर्व्हे करण्यात आला असून सदर भविष्यकालीन योजनेचे नाव सुतारवाडी लघु पाटबंधारे योजना असे प्रस्तावित आहे.

(२) सदर योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर प्रकल्पाचे अंदाजपत्रक माहे एप्रिल, २००७ मध्ये तत्कालीन उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, (कळवा) ठाणे या मंडळामार्फत कोकण पाटबंधारे विकास महामंडळास सादर करण्यात आले होते.

तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे पत्र दिनांक ०५/०८/२०१० अन्वये मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार रत्नागिरी जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष असला तरी जिल्ह्यात त्यावेळी प्रगतीपथावर असलेल्या योजनामधून सिंचनाचा अनुशेष भरुन येणार असल्याने रत्नागिरी जिल्ह्यात नविन सिंचन प्रकल्पाची आवश्यकता नाही, असे कळविले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवळे (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे बांधण्यात आलेल्या धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(७३) * ३५०४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळे (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे जवळपास साडेचार कोटी रूपये खर्च करून अनेक वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून धरण बांधल्यापासून धरणातून मोठया प्रमाणात पाणी गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील एकमेव असलेल्या धरणातून होणाऱ्या पाणी गळतीमुळे ग्रामस्थ पिण्याच्या पाण्यापासून वंचीत असुन शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असल्याने ग्रामस्थांनी याबाबत वारंवार तक्रार करुन सुद्धा संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अद्यापही धरण दुरूस्तीच्या कामाला सुरूवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार या विभागात पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी धरण दुरूस्तीच्या कामाला तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच धरणाच्या निकृष्ट कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

योजनेचे काम सन-२००३ मध्ये पुर्ण झाल्यावर पहिल्याच वर्षी सांडव्याच्या अधोबाजूच्या अश्मपटलावरुन गळती झाल्याचे निदर्शनास आले.

(३), (४) व (५) अशंत: खरे आहे.

दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. धरणाच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.